अत्त-दिप-भव

RENUKA SHIKSHAN PRASARAK MANDAL, NAGPUR

## साहित्यिक विशेषांक

वार्षिकांक

२०१८-१९

# शब्दांकुर



नॅक 'ब' दर्जा प्राप्त

## रेणुका कॉलेज


बँक ऑफ इंडिया जवळ, बेसा, नागपूर-३७. फोन : **07103 - 281455**

E-mail : renukamv.ngp@gmail.com | Website : www.renukacollege.org

*Our Inspiration*



**DR. BABASAHEB AMBEDKAR**

शिका - संघटीत व्हा - संघर्ष करा

## *Our Tower of Strength*



# LATE. SHRI. EKNATH GEDAM

**Founder, Renuka Shikshan Prasarak Mandal, Nagpur.**

"Some people are born and die
but few of them are born to serve humanity
and he was truly one of them".

# RENUKA COLLEGE

Accredited with "B" Grade by NAAC Bangalore

**Near Bank of India, Besa, Nagpur-37.**

## B.A., B.Com. Junior Arts & Commerce College

Accredited with Grade "B" by NAAC (Banglore), Permanenlty Affiliated to Rastrasant Tukadoji Maharaj Nagpur University

**Ph. No. : 07103-281455 | renukamv.ngp@gmail.com | www.renukacollege.org**



**Dr. Babanrao Taywade**

**President**

Sachidanand Shikshan Sanstha, Nagpur.



**Himanshu Eknath Gedam**

**Chairman**

Renuka Shikshan Prasarak Mandal, Nagpur.



**Smt. Manjusha Gedam**

**Secretary**

Renuka Shikshan Prasarak Mandal, Nagpur.



**Dr. Jyoti Patil**

**Principal**

Renuka College Besa Nagpur.

वार्षिकांक
२०१८-१९

# शब्दांकुर

## * संपादकिय मार्गदर्शक मंडळ *

### प्राध्यापक प्रतिनिधी



**डॉ. प्रेमा लेकुरवाळे**
मुख्य संपादक

### विद्यार्थी प्रतिनिधी



**सुबोध सूर्यवंशी**
B.Com III



**कल्याणी बरडे**
B.A III



**रोशनी देवतळे**
B.Com II



**मयुर वाटाणे**
B.A II



**प्रियंका चोपडे**
B.Com I



**सिमरन पठान**
B.A I



**सेजल पुंजे**
12th Arts



**रिना सहारे**
12th Arts



**सोहनलाल मरठा**
12th Commerce



**रोशनी ठाकरे**
11th Commerce

# RENUKA COLLEGE

Accredited with "B" Grade by NAAC Bangalore

## LOCAL MANAGEMENT COMMITTEE 2014-2019

- **Mr. Himanshu Gedam**
  Chairman
- **Mrs. Manjusha Manwatkar**
  Member
- **Dr. Narendra Dixit**
  Member
- **Dr. Kiran Nerkar**
  Member
- **Mr. Sanjay Bandre**
  Member
- **Mr. Namdev Kirsan**
  Member
- **Dr. Pravin Patil**
  Member/Teacher
- **Dr. Kailash Fulmali**
  Member/Teacher
- **Dr. Ramnik Lengure**
  Member/Teacher
- **Mr. Mukesh Thakre**
  Member/Non Teaching
- **Prin. Dr. Jyoti Patil**
  Secretary/Principal

# FROM PRINCIPAL'S DESK



Virginia Woolf, a famous English writer says"Every secret of a writer's soul, every experience of his life, every quality of his mind, is written large in his works." And I also feel the same when it comes to prominent writers in various fields and disciplines. I am immensely elated to know that SHABDANKUR, our college magazine is coming out with a special thrust on prominent Writers' works. A college magazine is the best means of providing a platform for the budding writers to express their creative ideas and feelings. This time it will also give students a fair chance to go through the prominent writers and express their views on them. It will also be a great inspiration to read the famous writers and get benefitted by it. It's true in this context what Bacon has preached "Reading makes a full man; Conference a ready man; and Writing an exact man." I strongly believe that focus on different writers on variety of subjects will surely add to their experience and expression. As Nelson Mandela believes, "Education is the most powerful weapon which you can use to change the world", I believe that reading and writing are best means of creativity and personality development, and thereby you get an inspiration to change and challenge the world.

I'm also highly impressed by the way the editorial board in which we have student-editors as well have worked on this special issue of 'Writer's Special'. I'll fail on my duty if I don't mention the tireless efforts of the magazine in-charge and editor, DrPremaLekurwale, who has put in her best to bring forth the magazine without any mistake or error and complete and informative in all respects.

The college magazine also includes reports of various college committees to showcase the curricular and extra-curricular activities during the session. As I'm proud to add that this year we got NAAC's grants to conduct a National seminar on NAAC's New Framework on Assessment and Accreditation and we conducted it with great success and innovative digitization.I also congratulate the students whose writings have been selected for publication in this issue. I hope it will be a good reading experience as well as a well-informed message to read more and be creative. I conclude with the brilliant verse of Edward Fitzerald:

**"With them the Seed of Wisdom did I sow,**
**And with my own hand labour'd it to grow;**
**And this was all the Harvest that I reap'd -**
**'I came like Water, and like Wind I go.'**

**Dr. Jyoti Patil**
Principal

# संपादकीय



सातत्याने प्रकाशित होणाऱ्या महाविद्यालयीन 'शब्दांकुर' २०१८-१९ या सत्राच्या विशेष अंकाचे संपादन करताना आम्हाला आनंद होत आहे. साहित्य आणि समाज या नाण्याच्या दोन बाजू आहे. समाज घडविण्याकरीता साहित्यिकांची भुमिका फार मोठी असते. म्हणून आमच्या साहित्यिक विशेषांक या विषयाचे औचित्य साधले.

प्राचीन साहित्यातील लेखक असो की अर्वाचीन जे जे सहजरित्या विद्यार्थी करू शकतील असे त्या त्या साहित्यिकांची माहिती विद्यार्थ्यांनां मिळावी हा एकमेव उद्देश डोळ्यासमोर ठेवून नवीन पिढीलाही सामर्थ्यशाली लेखकांच्या लेखनीतून प्रेरणा मिळेल. आमच्या रेणुका शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर संस्थेचे संस्थापक **(Founder President)** माननीय स्व. एकनाथजी गेडाम यांच्या विचारप्रणालीनुसार विद्यार्थ्यांना साहित्यिकांची आवड निर्माण व्हावी त्याकरिता त्यांनी भरपूर वाचन करावे व त्या आकलनातून कलाकृती निर्माण व्हावी हा त्यांचा दृष्टीकोन होता. त्याप्रमाणे आम्ही तो पुर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहो.

विद्यार्थी हा महाविद्यालयाचा केंद्रबिंदू असतो. त्यामुळे आमच्या महाविद्यालयात सातत्याने वर्षभर उपक्रम राबविले जातात. तसेच प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार केल्या जातो. त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून सदैव आम्ही प्रोत्साहन देत असतो. त्यांनी केलेल्या कामगिरीची नोंद या वार्षिकांकामध्ये घेण्यात येते.

वृत्तप्रत्रे, मासिके, पुस्तके, संदर्भग्रंथ इत्यादी विद्यार्थ्यांना वाचन करायला लावून त्यावर चिंतन-मनन करून महाविद्यालयातील साहित्यिक या विषयावर विद्यार्थ्यांना लेखकांविषयी माहिती व्हावी असा संकल्प केला. एक नवा पायंडा आदर्श म्हणून राहिल यात शंका नाही. मी जरी संपादक असले तरीही वार्षिकांकाचे संपूर्ण श्रेय माझे एकटीचे नाहीत. तर महाविद्यालयाचे संपूर्ण सहकारी वर्गांचेही आहे. 'शब्दांकुर' च्या याशस्वीतेसाठी रेणुका शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूरचे अध्यक्ष हिमांशु गेडाम, संस्थेचे सचिव मा. मंजुषा गेडाम, तसेच मा. प्राचार्य डॉ. ज्योती पाटील यांचे देखील बहुमूल्य मार्गदर्शन व सहकार्य लाभल्यामुळे निर्धारीत वेळेत वार्षिक अंकाचे प्रकाशन होऊ शकले, याबद्दल सर्वांचे शतश: आभार!

पब्लिकेशनचे संस्थापक श्री. आशिष फुलझेले तसेच त्यांच्या सहकारी वर्गाबद्दलही मी रेणुका कॉलेजच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करते.

धन्यवाद!

**सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्या!**

**आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने**
**शब्दांचीच शस्त्रे यत्न करू**
**शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन**
**शब्दे वाटू धन जनलोका।**

**डॉ. प्रेमा लेकुरवाळे**
(मराठी विभागप्रमुख)



वार्षिकांक
२०१८-१९
शब्दांकुर

मुखपृष्ठ व टाईपसेटिंग :
**सिद्धांत ग्राफिक्स** धरमपेठ, नागपूर
मो. ९८५०३५७१७६

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेख/कविता | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. कुसुमाग्रज | सेजल पुंजे | १ |
| २. कृष्णाजी केशप दामले | अश्विन कुमार ठाकुर | २ |
| ३. संदीप खरे | धिरज वंजारी | ३ |
| ४. राम गणेश गडकरी | सानिध्य सोनी | ४ |
| ५. डॉ. सलील कुलकर्णी | सूबोध सूर्यवंशी | ५ |
| ६. नारायण सूर्वे | संकेत ठाकरे | ६ |
| ७. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज | भारती तुरकर | ७ |
| ८. संत तुकाराम | साक्षी मेश्राम | ८,९ |
| ९. One More Step | आकांक्षा मानकर | १० |
| १०. William Shakespeare | अबोली मून | ११ |
| ११. संत कबीर | अंकिता देशमुख | १२,१३ |
| १२. अण्णाभाऊ साठे | संगीता मोरे | १४ |
| १३. वि.दा. करंदीकर | मयूर वटाणे | १५,१६ |
| १४. सूभद्राकुारी चौव्हान | रविणा चौव्हान | १७,१८ |
| १५. साने गुरूजी | अर्थव तांबसकर | १९ |
| १६. पु.ल. देशपांडे | निशांत चांदूरकर | २०,२१ |
| १७. मीराबाई | जयश्री मेश्राम | २२ |
| १८. रविंद्र नाथ टैगौर | सिमरन सोनकर | २३,२४ |
| १९. बा.भ.बोरकर | रोहित वाघ | २५ |
| २०. माझी जडणघडण | डॉ. मनोहर रोकडे | २६,२७ |
| २१. मराठी संत कवयित्री | पुजा ढवळे | २८,२९,३० |
| २२. A brief report on one day NAAC Sponsored National Seminar | Abdul Shamim Assit. Prof. | ३१,३२ |
| २३. Reservation | | ३३ ते ३७ |
| २४. सांस्कृतिक कार्यक्रम अहवाल २०१८-१९ | डॉ. कैलाश फूलमाळी (सां.वि) | ३८ |
| २५. महाविद्यालयीन ग्रंथालय | डॉ. रमणीक लेनगुरे | ३९,४०,४१ |
| २६. राष्ट्रिय सेवा योजना | डॉ. अतुल महाजन (रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी) | ४२ |
| २७. महाविद्यालयीन शा. शिक्षण व क्रिडा विभाग | डॉ. प्रविण पाटील | ४३ |
| २८. रेणुका कॉलेज सत्कार सोहळा | | ४४,४५ |

# कुसुमाग्रज



विष्णु वामन शिरवाडकर या नावाने गद्यलेखन व कुसुमाग्रज या नावाने पद्यलेखन केले. त्यांचा पहिला कवितासंग्रह 'विशाखा'. कुसुमाग्रजांनी त्यांच्या काव्यलेखनास प्रारंभ केला त्याला आजवर सुमारे पंच्याऐंशी वर्षे होऊन गेलीत. १९३३ पासून आतापर्यंत यांचे जीवनलहरी, किनारा, मराठी, माती, स्वगत, हिमरेषा, छंदोमयी, मारवा आदी कविता संग्रह व समिधा हा गद्यकाव्यांचा संग्रह प्रसिद्ध आहेत. १९६४ नंतरच्या काळातही त्यांनी लिहिलेल्या बऱ्याच कविता अनेक मासिकांतून प्रसिद्ध झाल्या.

कुसुमाग्रजांच्या या कल्पनाविलासाने प्रथम दर्शनातच रसिकांना स्तिमित करून टाकतात. हा कल्पनाविलास म्हणजे केवळ कल्पना-चमत्कृती नव्हती, आतीशबजी नव्हती तर त्यांच्याव्दारे आशयाचा रेखीव घाट घडत होता. विशेषत्वे 'कल्पनाचमत्कृतीसाठी कविता' हा मोह तर कुसुमाग्रजांनी कटाक्षाने टाळला. या कल्पनाविलासाचा ढंग अभिजात धाटणीचा, औचित्य सांभाळणारा होता आणि सर्वसामान्य वाचकास सहज प्रत्यय देईल.

सत्य, शिव, सौंदर्य यांचे अधिष्ठान असणाऱ्या नंदनाची उपासना करणाचा मराठी रोमांचक रोमँटिक संप्रदायाचे ते १९३३ ते स्वातंत्र्योतर व त्यानंतरच्या काळातही सर्वश्रेष्ठ प्रतिनिधी होते. केशवसुतांचा क्रातिकारक आवेश, ज्युलिअन यांचा स्वप्नाळूपणा त्यांच्या कुसुमाग्रजांच्या कवितेत नव्या जोमाने बहरले आहेत. सर्वांगीण सामाजिक क्रांती, राजकिय घडामोडी आणि सांस्कृतिक स्वातंत्र्य त्यांच्या विस्तृत संदर्भाकडे पाठ न फिरविता वैयक्तिक सुखदु:खाची अतिशय हळुवार जोपासना करु पाहणाऱ्या तरुण मनाची कविता ही जणु स्वतंत्र भारताची प्रतिनिधीक कविता आहे. तिची सात्विकता आणि भव्यता कायमची टवटवीत आहे.

१९६२ मध्ये भारत-चीन या दोन देशांमध्ये झालेल्या युध्दाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली 'आवाहन' ही कविता आहे. भारत-चीन युध्द हिमालयाच्या बर्फाळ रांगांमध्ये लढले गेले. या युध्दात हजारो भारतीय सैनिक मृत्युमुखी पडले. जणू भारतमातेचे रक्तच हिमालयावर सांडले. कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांनी भारतीयांना युध्दासाठी सज्ज राहणाऱ्यासाठी व हिंमत राखण्यासाठी या कवितेद्वारे आवाहन केले आहे.

काव्यसंग्रहाप्रमाणेच 'दुसरा पेशवा','वैजयंती', 'राजमुकुट','कौंतेय', 'नटसम्राट','वीज म्हणाली धरतीला ','ययाती' आणि देवयानी' इ. विष्णु वामन शिरवाडकरांची गाजलेली नाटके आहेत. 'नटसम्राट' या नाटाकास सहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. साहित्य क्षेत्रातील मानाचा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले. नुकताच विष्णु वामन शिरवाडकरांच्या नाटकावर आधारित 'नटसम्राट' हा चित्रपट प्रदर्शित झाला व अत्यंत गाजला देखील!

'' नटसम्राटमध्ये: कुणी घर देतं का घर ? असे म्हणत अवघ नाटक गाजलं, मात्र या नाटकाद्वारे अवघ्या महाराष्ट्राला आपलसं केल.......'' असे व्यक्तिमत्व! कुसुमाग्रज, कविश्रेष्ठ, विष्णु वामन शिरवाडकर नावे अनेक किर्तीही तेवढीच अद्वितीय! त्यांच्या लेखनात सहजतेचे मानवतावादी, चिंतनात्मक, जीवनसन्मुख विचार करण्याचे कौशल्य होते. कुणालाही सहज समजेल, असे त्यांचे लेखन मराठी साहित्य व वाङमयात त्यांचे साहित्यलेखनही विपुल प्रमाणात आढळते. १९१२-१९९९ या ८७ वर्षाच्या आयुष्यात त्यांनी असिमित कामगिरी केली. तेही उल्लेखनीय! त्यांच्याविषयी लिहायला गेले तर एक ग्रंथ तयार होईल, हे मात्र नक्की...!

**सेजल पुंजे**
१२ वी (कला)

# शिक्षण

त्यागुनी सेवा लाभाची, धुरा सांभाळली फुले साहेबांची
सावीत्रीच्या मायेची, पत्नी लाभली भाग्याची.

उठवूनी ताकद कार्याची दाविली शक्ती सहकाराची
जीवनी ध्येये महानतेची राखली शान पर्यावरणाची

चळवळ ती शिक्षणाची.
महिला सबलीकरणाची करून असे कार्य महान
मग झाला आपण गर्वाचा प्राण.



**दिशा सोनवाने**
B.Com II

# कृष्णाजी केशव दामले



कृष्णाजी केशव दामले यांचा जन्म ०७ आक्टोबर १७६६ साली मालगुंड जि. रत्नागिरी येथे झाला. यांचे टोपणनाव केशवसुत आहे. केशवसुत हे मराठी कवी होते. मराठीत संतकाव्य आणि पंतकाव्य ही परंपरा होती. ती मोडून अन्य विषयांवर कविता करणारे केशवसुत हे आद्य मराठी कवी समजले जातात. त्यांनी साहित्य क्षेत्रात अनेक कविता लिहील्या त्यापैकी'' आम्ही कोण?, झपुर्झा या प्रसिद्ध साहित्यकृती आहेत. केशवसुत यांना १९२१ साली डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीचे रु. ३५०/- चे बक्षीस मिळाले. त्याकाळातील ती सर्वाधीक रक्कम होती.

**आधुनिक मराठी काव्याचे जनक**

वर्षानुवर्षे एकाच विशिष्ट पध्दतीने रचल्या जाणाऱ्या कवितेला स्वच्छंद आणि मुक्त रूपात केशवसुतांनी प्रथम सर्वांसमोर आणले त्यामुळे त्यांना आधुनिक मराठी काव्याचे जनक म्हणून संबोधले जाते. आम्ही कोण?, नवा शिपाई, तुतारी, सतारीचे बोल, झपुर्झा हरपले श्रेय, मुर्तिभजन, गोफण या काही त्यांच्या उल्लेखनीय कविता आहेत.

**मराठी काव्यंतील योगदान**

इंग्रजी काव्य परंपरेतील रोमॅंटीक समजला जाणारा सौंदर्यवादी दृष्टीकोन प्रथम मराठी साहित्यात आणि काव्यात आणण्याचा मान केशवसुतांकडे जातो. कवीप्रतीभा स्वतंत्र असावी कविच्या अंत:स्फुर्ती खेरीज ती अन्य बाह्य प्रभावात ती असु नये असे त्यांचे म्हणणे होते. काव्य हुकुमानुसार नसावे, हा वास्तववाद मराठीत त्यांनीच आधुनीक परिभाषेत मांडला त्यांच्या काव्य विचारांवर वर्डस्वर्थ, शेली, किट्स यांसारख्या इंग्रजी कवीचा मोठा प्रभाव होता. पण त्यांची अविश्कार शैली भारतीय होती.

इंग्रजी काव्यतील चौदा ओळीचा सॉनेट हा काव्यप्रकार सुनीत या नावाने त्यांनी मराठीत लोकप्रिय केला त्यांनी लिहिलेल्या कवितांपैकी फक्त १३५ कविताच आज उपलब्ध आहे. पण त्यांच्या या अल्पसंख्य कवितांमध्ये अनेक विषय दिसुन येतात. अन्याय, विषमता, अंधश्रध्दा, परस्पर स्नेहाभाव, स्त्री पुरूषांमधील प्रेम, त्याचबरोबर सामाजिक बंडखोरी, मानवतावाद, राष्ट्रीयत्व, गुढ अनुभवांचे प्रकटीकरण आणि निसर्ग असे अनेक विषय त्यांनी सहजपणे हाताळले आहेत.

गोविंदाग्रज राम गणेश गडकरी बालकवी रेदाळकर यांसारखे सुप्रसिद्ध स्वत:ला केशवसुतांचे शिष्य म्हणवून घेत असत.

**अश्विन कुमार ठाकुर (B.Com II)**

# जीवन

संकटांना कधी कंटाळायचं नसतं
त्यांना सामोर जायचं असतं
कुणी नाव ठेवली तरी चांगलच करायचं असतं
आपलं काम चांगलचं करायचं असतं
आपमानाने कधी खचायचं नसतं.....

जिद्वाने बळ वाढवायचं असतं
निराश मुळीच व्हायचं नसतं
चैतन्य सदा फुलवायचं असतं
पुढे आणि पुढेच जायचं असतं.....

लोकनिंदेला कधी घाबरायचं नसतं
आपलं सामर्थ्य दाखवायचं असतं
जीवनात खुप करण्याजोगं असतं

पण आपलं तिकडे लक्षच नसतं......
रागाने कुणाला बोलायचं नसतं
प्रेमात लहान थोर पहायचं नसतं
एकमेकांना आधार देवून
मार्गक्रमण करायचं असतं.....

**अंकिता अलोने**
B.A III

# संदीप खरे



संदीप खरे यांचा जन्म १३ मे १९६३ रोजी झाला. संदीप खरे हे प्रसिद्ध मराठी कवी व गायक आहेत त्यांचे 'दिवस असे की' आणि 'आयुष्यावर बोलू काही' या गीतसंग्रह विशेष प्रसिद्ध आहे. सलील कुलकर्णीबरोबर त्यांनी बरेच गीतसंग्रह प्रकाशित केले आहेत त्यांच्या व्यासपिठावरील 'आयुष्यावर बोलू काही' या कार्यक्रमांमुळे ते सुरूवातीला प्रसिद्धी झोतात आले. त्यांचे १००० च्या वर प्रयोग झाले आहेत आजही त्यांचे कार्यक्रम हाऊसफुल असतात आयुष्यावर बोलु काही बरोबरच ते कवी वैभव जोशी ह्यांच्यासोबत 'इर्शाद' हा कवितांचा कार्यक्रम देखील करतात.

संदीप खरे यांनी इयत्ता चौथीत असताना पहीली कविता केली. अनेक शालेय स्पर्धामध्ये त्याने कविता आणि कथा या विषयात अनेक परीतोषीके मिळवली आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषदेने आयाजलेल्या उमलते अंकूर या कार्यक्रमात त्यांनी सादर केलेल्या कविता ही कवी म्हणून ओळख निर्माण होण्याच्या दृष्टीने महत्वाची घटना ठरली.

'मौनाची भाषांतरे, कधी हे कधी ते, नेणिवेची अक्षरे, तुझ्यावरच्या कविता'' इ. कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाने ''दिवस असे की, मी गातो एक गाणे, कधी हे कधी ते, आयुष्यावर बोलू काही, नामंजूर, संग सख्या रे, अग्गोबाई ढग्गोबाई, डिबाडी डिपांग, दमलेल्या बाबांची कहाणी, हृदयामधले गाणे इ. गीतसंग्रह प्रसिद्ध आहेत.

१३ मार्च २००६ साली पुण्य गौरव पुरस्कार, १६ फेब्रुवारी २००८ रोजी झी गौरव पुरस्कार, ११ मार्च २०१० रोजी आद्यकवी मुकुंदराज पुरस्कार, १४ ऑगस्ट २०११ रोजी बालगंधर्व पुरस्कार तसेच १४ ऑगस्ट २०११ रोजी त्यांना विशेष व्यावसायीक गुणवत्ता पुरस्कार इ. पुरस्कार त्यांनी संपादन केले आहे.

**धिरज वंजारी**
**(B.A II)**

# माँ तू होती तो......

नींद बहुत आती है पढते पढते.....
मॉ होती तो कह देता, एक प्याली चाय बना दे!!

थक गया, जली रोटी खा खा कर
मॉ होती तो कह देता पराठे बना दे!!

भीग गयी आसुओं से आँखे मेरी...
मॉ होती तो कह देता आँचल दे दे!!

रोज वही कोशिष खुश रहने की,
माँ होती तो मुस्कुरा लेता!!

देर रात हो जाती है घर पहुचते-पहुचते
माँ होती तो वक्त से घर लौट-जाता!!

सुना है कई दिनों से वो भी नही मुस्कुराई,
ये मजबुरिया न होती तो घर चला जाता!!

बहुत दूर निकल आया हु घर से अपने,
ते तेरे सपनो की परवाह न होती,
.......तो बस चला आता!!



**अभिषेक कहाते**
B.Com III

# राम गणेश गडकरी



राम गणेश गडकरी यांचा जन्म २६ मे १८८५ साली गुजरातमधील नवसारी येथे झाला. राम गणेश गडकरी यांचे टोपणनाव गोविंदाग्रज आहे. हे मराठी कवी नाटककार आणि विनोदी लेखक होते. गोविंदग्रज ह्या टोपणनावाने त्यांनी सुमारे १५० कविता लिहील्या आणि बालकराम ह्या साहित्याच्या जोडीला एकच प्याला, प्रेमसन्यास, पुण्यप्रभाव आणि भावबंधन ही चार पूर्ण नाटके आणि राजसंन्यास आणि वेड्याचा बाजार ही दोन अपुरी राहिलेली नाटके लिहून गडकरींनी मराठी साहीत्यात मोलाची भर घातली.

राम गणेश गडकरी यांना महाराष्ट्राचा शेक्सपीअर समजले जाते. विविध नाट्यप्रेमी संस्थानी राम गणेश गडकरी यांच्या नावाने नाटककारांसाठी अनेक गडकरी पुरस्कार ठेवले आहेत. नागपूरला राम गणेश गडकरी या नावाचा एक साखर कारखाना आहे.

**जीवन संपादन**

गोविंदांग्रज यांच्या वयाच्या ८ वर्षी त्यांचे वडील गणेश वासुदेव गडकरी निवर्तले. वडिलांच्या मृत्युनंतर त्यांचा धाकटा भाऊ गोविंदही अकालीच मरण पावला. या कौटुंबिक धक्क्यातुन सावरताना गडकरीचे कुटुंब पुण्यात स्थायीक झाले. गडकऱ्यांचे शालेय शिक्षण पुण्यातील न्यु इंग्लिश स्कुलमध्ये व त्यानंतरचे शिक्षण फर्ग्युसन महाविद्यालयात झाले.

महाविद्यालयात शिकत असतना मित्राच्या ओळखीने गडकरी किर्लोस्कर नाटक मंडळीत दाखल झाले. या किर्लोस्कर नाटक मंडळीने चालवलेल्या रंगभुमी नावाच्या मासीकातुन तसेच शिवराम महादेव परांजपे यांच्या काळ वृत्तपत्रतुन व हरीभाऊ आपट्यांच्या 'करमणुक' नियतकालीकातुन ते कविता, लेख लिहू लागले. कविता व लेखांसोबतच ते नाट्यलेखनही करू लागले.

**नाटके संपादन**

गडकऱ्यांच्या अनेक नाटकांची नावे पाच अक्षरीच आहे. त्यांची नाटके हा आजही अनेकांच्या अभ्यासाचा विशय आहे. भावबंधन, एकच प्याला यांसारख्या नाटकांची तर आजही एव्हरग्रीन म्हणून जाहिरात केली जाते. वेड्याचा बाजार आणि राजसंन्यास ही त्यांची नाटके मात्र अपुर्ण राहिली गडकरी दिर्घायुषी झाले. असते ती नाटके मात्र अपुर्ण झालीच असती पण आणखी काही नव्या नाटकांचीही त्यात भर पडली असती मराठीचे शेक्सपीअर असा त्यांचा सार्थ उल्लेख होतो तो मुखत्वे नाटकासाठीच. नुसती नाटकेच नाही तर त्यांची सुधाकर सिंधु, तळीराम, घनश्याम, लतिका वगैरे पात्रेही अजरामर झाली आहेत. काळ बदलला खरे तर गडकऱ्यांनी हाताळलेले दारूबंदीसारखे विषयही कालबाह्य झाले. पण गडकऱ्यांची नाटके सदाहरीत राहिली याचे श्रेय त्या देवरदुर्लभ अशा लेखणीलाच द्यायला हवे. एकच प्याला, गर्वनिर्वाण, पुण्यप्रभाव, प्रेमसंन्यास, भावबंधन मित्रप्रीती, राजसंन्यास, वेड्याचा बाजार इ.

**काव्य संपादन**

वाग्वैजंती हा गडकरी एकमेव काव्यसंग्रह आहे मुक्तछंदापासुन ते छंदबद्ध कवितेपर्यंत आणि चार ओळीच्या कवितेपासुन ते दहा पाने भरतील एखाद्या दीर्घकवितापर्यंत अनेक प्रकार त्यांनी यात हाताळले आहेत ते कवितांची पार्श्वभुमी एखाद दुसऱ्या परिच्छेदात सांगुन नंतर कविता सादर करीत आपले लहान बालक मृत्युशय्येवर असतानाची मातेची मन:स्थिती राजहंस माझा निजला ह्या कवितेत गडकऱ्यांनी मांडलेली आहे. त्या कवितेच्या प्रस्तावनेचा तो परिच्छेद वाचला की कवितेत शिरण्याची एक विशिष्ट मन:स्थिती तयार होते. कवितालेखनासाठी गडकऱ्यांनी गोविंदग्रज हे टोपणनाव घेतले होते.

**सानिध्य सोनी**
**(B.A II)**

# डॉ. सलील कुलकर्णी



डॉ. सलील कुलकर्णी यांचा जन्म ६ ऑक्टोबर इ.स. १९७२ साली पुणे येथे झाला. डॉ. सलील कुलकर्णी हे नावाजलेले मराठी-भारतीय गायक, संगीतकार, लेखक आहेत.

डॉ. सलील कुलकर्णी यांचे लग्न सुप्रसिद्ध गायीका अनुराधा मराठे यांची मुलगी अंजली यांच्याशी झाले असुन त्यांना शुभम आणि अनन्या ही अपत्ये आहेत. ते आणि अंजली कुलकर्णी कोथरूड मध्ये सलील कुलकर्णी म्युझीक स्कुल चालवतात.आयुष्यावर बोलु काही, नामंजूर, दमलेल्या बाबांची कहाणी, आनंद पहाट, संधीप्रकाशात, अग्गोबाई ढग्गोबाई, दिवस असे की, डिपाडी डिपांग आणि अग्गोबाई ढग्गोबाई भाग २ इ. अलबम त्यांचे प्रसिद्ध आहेत. त्याची काही चित्रपटही प्रसिद्ध आहेत. एक अनाड दिवस, चकवा, चिंटू इ.

डॉ. सलील कुलकर्णी यांची लपलेल्या काचा आठवणी हिचे प्रकाशन एप्रील २०११ तर शहाण्या माणसांची फॅक्टरी संकीर्ण ललित लेखन या पुस्तकाचे प्रकाशन २६ जानेवारी २०१७ मध्ये झाले. लोकसत्ता व सकाळ वृत्तपत्रामध्ये ते स्तंभ लेखनाचे काम करतात.

**पुरस्कार :**

स्वरानंद प्रतीष्ठान या संस्थेला १९९८ सालचा केशव भोळे पुरस्कार, आर्ट सर्कल आणि आशय सांस्कृतिक संस्थेतर्फे पुलोत्सव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. त्याना संस्कृती कला पुरस्कार २६ मे २०१३ तसेच दत्ता डावजेकर फाउंडेशनचा पुरस्कार २१ नोव्हेंबर २००९ रोजी उत्कृष्ट संगीत दिग्दर्शक चित्रपट- हाय काय नाय काय या चित्रपटाला मिळाला.

**सुबोध सुर्यवंशी**
(B.Com III)

## एक सैनिक की आत्मकथा

एक भीड मेंरहनेवाला इन्सान,
एक बार वर्दी पहन के देख......

ऑर्डर के चक्रव्युह मे,
छुटी काट कर के तो देख......

बॉर्डर की ठंडी हवा मे चलकर
घर की तरफ मुड के तो देख....

घर से चलने से पहले
अगली छुट्टी के सपने तो देख...

कल छुट्टी आऊंगा बोलके
अपने लाईफ को समझाके तो देख.....

थकी हुई आँखो से याद करनेवाले,
माँ बाप को अपना मुस्कुराता चेहरा तो देख.....

ये सब करते समय,
दुश्मनकी गोली सीने पर लेकर तो देख.....

आखरी सांसे लेते समय,
तिरंगे को सलाम करके तो देख.....

सरकार कहती है शहिद की परिभाषा नही है,
दम है तो भगतसिंह बन के तो देख.....

देश पर मिट कर भी मुझे शहीद न करनेवाले,
अगर दम है तो एक बार वर्दी पहन के तो देख......



**प्रियंका चोपडे**
B.Com I

# नारायण सुर्वे



नारायण सुर्वे यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९२६ रोजी झाला. आम्ही नसतो तर हे सूर्यचंद्र, तारे बिचारे फिक्के फिक्के असते बाप हो! तुमच्या व्यथांना शब्दांना अमर कोणी केले असते. जन्ममरणाच्या प्रवासात आम्हाशिवाय सोबतीस कोण असते. चला बरे झाले आम्हालाच कवितेत खराब व्हायचे होते... जेव्हा मी या अस्तित्वाच्या पोकळीत नसेन, तेव्हा एक कर,अशा अनेक कवितांनी मराठी रसीकांच्या मनावर राज्य गाजवणारे कवी म्हणजे मा. नारायण सुर्वे.

१९२६-२७ मध्ये मुंबईतील चिंचपोकळीत एका कापडगिरणीसमोर रस्त्यावर हा अनाथ जीव गंगाराम सुर्वे या गिरणी कामगाराने उचलून घरात आणला गिरणी कामगारच असलेल्या काशीबाई सुर्वे यांनी या ''बाळगलेल्या पोराला'' स्वत:च्या मुलासारखे प्रेम दिले आणि नारायण गंगाराम सुर्वे हे नावही दिले. परळच्या बोगद्याच्या चाळीत ते वाढले कमालीचे दारीद्र्य अपरंपार कबाडकष्ट आणि जगण्यासाठी केलेला संघर्ष यातून त्यांचे आयुष्य चांगलेच शेकून निघाल. घरात अठराविश्व दारीद्र्य असतानाही या नारायणाला चार अक्षरे लिहीता-वाचता यावीत म्हणून दादर, अप्पर माहीम मराठी महापालीका शाळेत घातले नारायण सुर्वे १६३६ मध्ये चौथी इयत्ता उत्तीर्ण झाले आणि गंगाराम सुर्वे गिरणीतुन निवृत्त झाले. निवृत्तीनंतर मुंबई सोडून ते कोकणात गावि निघून गेले. गावी जाताना त्यांनी नारायणाच्या हातावर दहा रुपये ठेवले आणि समोर मुंबईचा विशाल सागर.

मग भाकरीचा चतकोर मिळण्यासाठी ते एका सिंधी कुटुंबात घरगडी, हॉटेलात कपबशा विसळणारा पोऱ्या, कुणाचे कुत्रे- कुणाचे मुल सांभाळणारा हरकाम या दुध टाकणारा पोरगा, अशी कामे करीत वाढले. गोदरेजच्या एका कारखान्यात त्यांनी पत्रे उचलले. टाटा ऑइल मिलमध्ये हमाली केली. काही काळ गिरणीत धागाही धरल. बॉबीन भरली मुंबई महापालिकेच्या शाळेत शिपाई म्हणून नोकरी केली आणि मध्ये शिपायाचे शिक्षक झाले. महापालिकेच्या नायगाव नंबर एक शाळेत त्याची शिक्षक म्हणून नोकरी सूरू झाली ते तेव्हापासुन गिरगावचे 'सुर्वे मास्तर' झाले. कधी दोन घेत कधी दोन देत. आयुष्याची वाटचाल सूरू असतानाच जिंदगीच्या धगीवर शब्द शेकुन घेत त्यांनी मराठी काव्यप्रांतात एक नवा सुर घुमवला त्यांची पहिली कविता १९५८ मध्ये 'नवयुग' मासिका प्रसिद्ध झाली '' डोंगरी शेत माझ गं....' हे त्यांचे पहीले गीत एचएमव्ही ने त्याची ध्वनीफीत काढली.

१९६२ मध्ये ''ऐसा गा मी ब्रम्ह'' प्रकाशितझाला. त्याला राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला त्यानंतर सुर्वे यांचे कवितासंग्रह एकामागोमाग येत राहीले गाजत राहीले ''माझे विद्यापीठ'' जाहीरनामा, पून्हा एकदा कविता, सनद हे त्यांचे कवितासंग्रह नातबंद्वाला याकुब, चंद्रा नायकीग, दाऊद शिगवाला, हणम्या, इसल्या, पोटाची खळगी भरण्यासाठी सह्याद्रीचा कडा उतरून मुंबईत कामधंद्याच्या शोधत आलेल्या व समुद्राच्या तीरावर झुंजत मरण पावलेल्या एका कष्टकरी मुलाचा बाप, आपल्या तारूण्यातील पराक्रम मुलाला ऐकवणारा वृद्ध पिता, गोदीवर काम करणारा आफ्रिकन चाचा, पंडीत नेहरूंचे निधन झाले म्हणून धंदा बंद ठेवणारी सुंद्री वेश्या अशी अनेक व्यक्तीचीत्रे त्यांनी अत्यंत समर्पकाने व रेखीवपणे उभी केली आहेत. सुर्व्यांचे पहीलेवहीले काव्यवाचन झाले ते कुसुमाग्रजांच्या अध्यक्षतेखाली गडगावच्या साहीत्य संमेलनात त्या वेळेपासुन ते प्रत्येक काव्यमैफीलीत खड्या सुराने रंग भरत आहेत ''मास्तर तुमचंच नाव लिवा...' ''असं पत्रात लीवा'' मर्ढेकर '' सर कर एकेक गड''मनीऑर्डर '' मुंबईची लावणी' गिरणीची लावणी' या त्यांच्या कवीता हमखास पावती घेतात श्री सुर्वे यानी त्यांच्या कवितेतुन ईश्वरवादी प्रारब्ध उच्च-निचता किंवा जातीचा कधिही पुरस्कार केलेला नाही. त्यांनी मराठी कवितेत कामगारांचे हातावर पोट असणाऱ्याचे जग शब्दबध्द करून आणि त्यांच्या संघर्षातून कृतीशील आशावादाकडे झेपावणाऱ्या आकाशांचे चित्रण पुरोगामी विचारांच्या मढीतून निघालेल्या शतकेद्वारे केले आणि मराठी कवितेला सामाजिक बांधीलकीचा विशाल आशय प्राप्त करून दिला आहे.

ज्यांना सुर्वे दिसु आले नाहीत अशांसाठी जेष्ठ साहित्यिक पु.ल. देशपांडे यानी एकदा सांगीतले अरे केशवसुत कशाला शोधताय पद्मश्री सोव्हियेत रशियांचचं नेहरू अवार्ड, जनस्थान पुरस्कार, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, नरसिंह मेहता पुरस्कार, कराड साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार असे अनेक पुरस्कार देऊन गौरव झाला मा. नारायण सुर्वे यांचे १६ ऑगस्ट २०१० रोजी निधन झाले.

**संकेत ठाकरे**

**(B.Com I)**

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज



आध्यात्मिक प्रेरणा व राष्ट्राच्या उद्धाराची तळमळ यांची सांगड घालणाऱ्या संत तुकडोजी महाराजांना यथार्थपणे 'राष्ट्रसंत' या पदवीने गौरवले गेले आहे राष्ट्राच्या उद्धारासाठीच त्यांनी आपले सर्व जीवन व्यतीत केले. अशा या राष्ट्रसंताचा जन्म अमरावती जिल्ह्यातील यावली येथे १९०६ साली झाला त्यांचे मुळ नाव माणिक बंडोजी ठाकूर. ठाकूर घराणे विदर्भातील पण त्यांचे कुलदैवत मात्र पंढरीचा विठोबा हे होते लहान वयातच त्यांच्या मनात भक्तिमार्गाची ओढ निर्माण झाली इयत्ता तिसरी नंतर त्यांनी शिक्षण सोडून दिले आणि ते भग्वद्भक्तीत रममाण होऊ लागले. ध्यान, भजन, पूजन, किर्तन करता करता ते स्वत:ही पदे रचू लागले. वरखेडचे आडकूजी महाराज हे त्यांचे गुरू त्यांच्या या गुरूनीच त्यांना 'तुकडोजी महाराज' हे नाव रूढझाले. 'तुका म्हणे' या धर्तीवर त्यांनी 'तुकड्या म्हणे' या शब्दात स्वत:चे नाव गुंफून अक्षरश: हजारो अभंग लिहीले. तुकडोजी महाराजांचा विषेश हा की, त्यांनी आपल्या किर्तनांचा व भजनांचा उपयोग समाजसेवासाठी केला.

परंपरागत अनिष्ठ रूढी जातिधर्म पंथभेद अंधश्रद्धा इत्यादी समाजविघातक गोष्टींवर त्यांनी सतत कठोर प्रहार केले. तुकडोजीच्या या प्रयत्ननांमुळे सर्व धर्मपंथाचे लोक त्यांच्याकडे आकृष्ट झाले. आत्मसंयम आणि देशभक्ती हे अनमोल गुण त्यांनी लोकांना शिकवले त्यासाठी त्यांनी 'गुरूदेव' सेवा मंडळे' स्थापिली. संत तुकडोजी महाराजांनी त्यासाठी खुप प्रवास केला. 'आदेश रचना' हा ग्रंथही लिहीला. १९३० साली तुकडोजी महाराजांचा महात्माजींशी संपर्क आला आणि मग त्यांनी राष्ट्रकार्याकरिताच आपले जीवन समर्पित केले. आपल्या मताच्या प्रचारार्थ त्यांनी सुमारे ४० पुस्तके प्रसिद्ध आहेत. 'ग्रामगीता' या काव्यग्रंथात ४१ अध्याय व ४६७५ ओव्या आहेत. या ओव्यांतून त्यांनी मानवी जीवनाच्या उन्नतींचे मार्ग सांगितले आहेत. या आधुनिक संताने सदैव प्रयत्ननांच महत्त्वदिले. दैववाद त्यांनी कधीच जवळ केला नाही ते सांगतात-

**प्रत्येक गाव झाला आदर्श। प्रत्येक सुखी होय स्वदेश। प्रत्येक विश्वशांतीचे सायास। सफल होती।।**

१९४२ च्या चले जाव, आंदोलनात भाग घेतलेल्याने त्यांना कारावासही भोगावा लागला स्वातंत्र्यानंतर भूदान, जातिनिर्मुलन अशा कार्यांकडे त्यांनी विशेष लक्ष पुरवले. १९५५ मध्ये संत तुकडोजी महाराज विश्वधर्म व विश्वशांती परीषदेसाठी जपानला गेले होते. त्यावेळी तेथील विद्वानही तुकडोजींच्या भजनांनी मोहीत झाले होते १९६६ मध्ये ते विश्वहिंदू परीषदेचे अध्यक्ष झाले. व्यक्तिविकास समाजजागृती याबारोबर धार्मिक एकात्मता निर्माण करण्यासाठी ते अखेरपर्यंत झटके भारताची बहुसंख्य जनता ही अज्ञान दारिद्र्यात खितपत पडली होती. खेड्यापाड्यापातून वास्तव्य करणाऱ्या या जनतेचा उद्धार म्हणजेच राष्ट्राचा उद्धार ही त्यांची दृष्टी होती. ग्रामोद्धार' हाच विचार त्यांच्या सर्व कार्यांच्या केंद्रस्थनी होता. १९६८ मध्ये त्यांच्या मोझरी येथील गुरुकुंज आश्रमात त्यांचे निधन झाले. राष्ट्रासाठी अखेरपर्यंत झगडणारे ते एक राष्ट्रसंत होते.

**भारती तुरकर**
**(B.Com I)**

## पिवळं पान....

असते बसलेली झाडाच्या सावलीत आरामात,
मातीवर अच्छादलेल्या रंगीत गालीच्यावर आनंदात।

हिरवी, लाल, पिवळी पानं स्वच्छंदी पसरतात,
पिवळी पानं उडून गिरकी घेऊन मला खुणावतात।

विचारतात कधी होणार ग तुझ पिवळं पान?
कधी सोडवणार ग तू हा अहंकार, मान, अपमान?
वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत, शिशिर येतात अन् जातात,
सृष्टिच्या कालचक्राचे तू हे बदलतचं राहतात।

हिरव्याचं पिवळ हे कधीतरी होणारच आहे,
मी वाट बघतेय कधी माझा शरद येणार आहे?



**श्रुतिक्षा निमपुरे**
१२ वी कला

# संत तुकाराम



संत तुकाराम उर्फ तुकोबा हे इ.स. च्या सतराव्या शतकातील एक वारकरी संत होते. त्यांचा जन्म वसंत पंचमीला-माघ शुद्ध पंचमीला झाला. पंढरपुरचा विठ्ठल वा विठोबा हे तुकारामांचे आराध्यदेव होते. तुकारामांना वारकरी 'जगद्गुरु' म्हणून ओळखतात. वारकरी सांप्रदायातल्या प्रवचन व किर्तनाच्या शेवटी- 'पुडलीक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढारीनाथ महराज की जय, जगग्दुरु तुकाराम लोककवी होते.संत तुकाराम याचे मुळ नाव तुकाराम बोल्होबा आंबीले मोरे त्यांचा जन्म १ फेब्रुवारी १६०७ रोजी देहु येथे झाला. तुकाराम यांच्या वडीलांचे नाव बोल्होबा मोरे आईचे नाव कनकाई बोल्होबा मोरे आणि पत्निचे नाव आवली आहे त्यांना ४ आपत्ये आहेत महादेव, विठोबा, नारायण, भागुबाई ही त्यांची चार अपत्ये आहेत.

**जीवनः**

तुकारामांच्या जन्मवर्षाबद्दल इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. त्यातल्या चार सांभाव्य तारखा इ.स. १५६८, इ.स. १५७७, इ.स. १६०८ आणि इ.स. १५९८ या आहेत. इ.स. १६५० मध्ये एका सार्वजनिक समारंभात त्यांचा देव विठ्ठल त्यांना सदैव वैकुंठी घेऊन गेला असे मानले जाते.

त्यांचे घराणे मोरे क्षत्रीय आणि आडनाव अंबिले आहे. यांच्यात घराण्यातील विश्वंभरबुवा हे मूळ पुरुष महान विठ्ठलभक्त होते. त्यांच्या घराण्यात पंढरीची वारी करण्याची परंपरा होती. त्यांचे वडील बोल्होबा व आई कनकाई होत. त्यांना सावजी हा मोठा भाऊ होता. मोठा भाऊ व कान्होबा धाकटा भाऊ होता. मोठा भाऊ सावजी विक्र वृत्तीचा होता. घराची संपूर्ण जबाबदारी तुकोबांच्यावरच होती. पुण्याचे अप्पाजी गुळवे यांची कन्या जिजाई आवडी तुकोबांना त्यांच्या प्रापंचिक जीवनात विपत्तीचे तडाखे सहन करावे लागेल. अनेक प्रापंचिक दु:खे भोगावी लागली. ते १७-१८ वर्षाचे असताना त्यांचे आई-वडील मरण पावले, मोठा भाऊ विरक्तीकडे तीर्थाटनाला निघुन गेला. भयंकर दुष्काळाचा त्यांना सामना करावा लावला. संतू नावाचा त्यांचा मोठा मुलगा दुष्काळातून गेला, गुरे ढोरेही गेली, महाजनकी बुडाली. मन उदास झाले, संसारात विरकी आली. या परीस्थितीत त्यांनी श्री विठ्ठल वरची आपली परमभक्ती कायम ठेवत भंडारा डोंगरावर उपासना चालू केली. चिरंतनाचा, शाश्वतांचा शोध घेत असताना त्यांना साक्षात्कार झाला. तेथेच परब्रम्हस्वरूप 'श्री विठ्ठल' त्यांना भेटला असे मानले जाते. तुकारामांचा साक्करीचा परंपरागत व्यवसाय होता. परंतु एकदा दुष्काळ पडला असता त्यांनी सर्व कुळांना त्यांच्या सावकारीच्या पाशातून मुक केले. जमिनीच्या गहाणवटीची कागदपत्रे इंद्रायणी नदीत टाकून दिली. पुढे प्रवचने-किर्तन करताना तुकारामांना अभंगाची रचना स्फुरू लागली.

फाल्गुन वद्य द्वितीयेला तुकारामांचे संदेह वैकुठ-गमन झाले. असे मानले जाते. हा दिवस ' तुकाराम बीज' म्हणून ओळखला जातो. तुकाराम हे मराठीतील ख्यातनाम संत आहेत.

**जीवनोत्तर प्रभावः**

संत बहिणाबाई शिवूर ता. वैजापूर ही तुकारामांची शिष्या तुकारामांनी तिला स्वप्नात गुरुपदेश दिला होता. तुकाराम महाराजांनी वैकुठगमन केल्यावर बहिणाबाईची निष्ठा पाहून तिला साक्षात दर्शन दिले होते, असे म्हणतात. तुकारामांनी बहिणाबाईला बौध्दांच्या 'वज्रसुची' या बंडखोर ग्रंथांचे मराठी भाशांतर करायला सांगितले होते. यावरून तुकाराम महाराज पाळीत असलेल्या धर्माचे स्वरूप किती उदार होते याची कल्पना यावी.

**तुकारामांनी लिहीलेली पुस्तकेः**

१) गीतागाथा (संपादक प्रभाकर जोगंदड): संत ज्ञानेश्वरांप्रमाणे संत तुकाराम यांनीही भग्वद्गीतेवर टीका केली आहे. तुकारामांच्या भग्वद्गीतेवरील भाष्यांचा 'गीतागाथा' हा ग्रंथ आहे. पोथींच्या आकारातील हा ग्रंथ, भग्वद्गीतेचे श्लोक, आणि त्या श्लोकांचा अर्थ सांगणारे जे अभंग तुकारामांनी लिहीले, त्याविशयी आहे. या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रभाकर जोगंदड यांनी स्वत:च्या सुंदर हस्ताक्षरात या ग्रंथाचा शब्दन् शब्द लिहीला आहे. हा ग्रंथ एखादी हस्तलिखीत पोथी हाताळत आहोत की काय असे वाटायला लावणारा आहे. गीतेचे ७०० श्लोक आणि तुकारामाचे ७०० अभंग लेखकाने एकाने लिहीलेले आहेत.

२) तुकारामांच्या अभंगाची गाथा महाराष्ट्र सरकारने आणि शिवाय अनेक प्रकाशकांनी पुस्तकरूपाने प्रसिद्ध केली आहे. गाथेचे तेलगु लिपीत लिखांतर लेखक- वार्णे गजेंट भारती महाराज

३) तुकराम गाथा (संपादक नारायाण साखरे)

४) दैनंदिन तुकाराम गाथा (संपादक माधव कानिटकर)

५) श्री तुकाराम गाथा (संपादक स.के. नेऊरगावकर)

**चित्रपट**

१) इ.स. १९३६ मध्ये प्रभात फिल्म कंपनीच्या विष्णुपंत दामले आणि फत्तेलाल शेख यांनी मराठीत ‘संत तुकाराम’ या नावाने चित्रपट बनवला. या चित्रपटाला अपुर्व यश प्राप्त झाले. १२ डिसेंबर १९३६ रोजी मुंबईच्या सेंट्रल सिनेमा येथे प्रदर्शित झालेल्या या चित्रपटात विष्णुपंत पागणीस यांनी संत तुकाराम यांचे काम केले होते. ५ व्या व्हेनिस चित्रपट उत्सवामध्ये या चित्रपटाला पुरस्कार मिळाला होता. भारतातील अनेक भाषांमध्ये संत तुकाराम यांच्यावर चित्रपट काढण्यात आले. हा चित्रपट एकाच चित्रपटगृहात वर्षभर चालू होता. हा त्या काळचा उच्चांक होता.

२) हा चित्रपट येण्याआधी तुकारामांवर तीन चित्रपट बनले होते. पहिला मुकपटांच्या जमान्यात कोहिनूर फिल्म कंपनीने निर्माण केलेला ‘संत तुकाराम’ त्यानंतरचे दोन तुकाराम आले ते बोलपटांच्या जमान्यात १९३२ मध्येच. यांपैकी एक तुकाराम निर्माण केला होता ‘शारदा फिल्म कंपनी’ ने आणि दुसरा मास्टर अँन्ड कंपनीने‘संत तुकाराम’ अर्थात ‘जय विठ्ठल’ या नावाने शुक्ल नावाच्या नटाने यात तुकारामांची भुमिका केली होती यापलीकडे या चित्रपटांची काहीच माहीती उपलब्ध नाही. हा चित्रपट म्हणजे एका नाटकाचे चित्रण होते. शारदा फिल्म कंपनीच्या ‘तुकाराम’ मात्र चित्रपट म्हणूनच तयार करण्यात आला होता. या तुकारामाचीही काही माहिती आज उपलब्ध नाही.

३) १९६३ मध्ये संत तुकाराम नावाचा कानडी चित्रपट आला होता. दिग्दर्शक- सुंदराराव नाडकर्णी

४) १९६५ मध्ये तुकारामांवर हिंदी चित्रपट आला. त्यांचे नाव होते. ‘संत तुकाराम’ राजेश नंदा यांनी दिग्दर्शित केलेला हा चित्रपट अशोक फिल्म्सने निर्माण केला होता. शाहु मोडकांनी यात तुकारामांची भुमिका केली होती. तर अनिता गुहा ‘आवडी’ बनल्या होत्या.

५) ‘तुका आकाशा एवढा’ हा मराठी चित्रपट २०१६ साली आला होता. दिग्दर्शक- जितेंद्र वाईकर.

तुकारामाचे चरित्र, अभंग आणि त्यांसंबंधी लिहीली गेलेली पुस्तके:

तुकारामांचे ‘तुकाराम बाबांचे चरित्र’ नावाचे मरठीतले पहिले चरित्र कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांनी इ.स. १८९६ लिहीले. ‘आध्यात्मिक ज्ञान रत्नावली’ नावाच्या मासिकात हे चरित्र क्रमशः प्रसिध्द झाले होते. न्यायमुर्ती रानडे यांनी यांनी या चरित्राचे कौतुक केले होते. न्याय दक्षिणा प्राईज कमिटीने या पुस्तकाला पहीले बक्षीस दिले होते. चमत्कारांवर भर न देता संत तुकारामांचा थोरपणा पुस्तकात सांगीतला आहे. २०१५ साली औरंगाबादच्या साकेत प्रकाशनाने या पुस्तकाची ‘संत तुकाराम’ या नावाची नवी आवृत्ती काढली आहे.

अन्य पुस्तके:

१) आनंद ओवरी (कादंबरी-लेखक दि.बा. मोकाशी)

२) आनंद डोह (२०१४) नाटक-लेखक: योगेश्वर

३) तुका झाला पाडुरंग (कादंबरी भा. द. खेर)

४) तुका गाथा (भालचंद्र नेमाडे)

५) तुका म्हणे : लेखक डॉ. सदानंद मोरे

**शब्द**

घासावा शब्द, तासावा शब्द तेलावा शब्द, बोलण्यापुर्वी शब्द हेची कातर, शब्द सुईदोरा
बेतावेत मोजके, नेमके, खमंग, खमके ठेवावे मान, देष, काळ, पत्राचे बेलावे बरे, बोलावे खरे
कोणच्याही मनावर, वाडु नये चरे, कोणाचेही वर्म, त्यंग आणि बिंग जात पात धर्म काढूच नये,
थोडक्यात समजणे, थोडक्यात समजावणे मुद्देसूद बोलणे, ही संवाद कला शब्दांमध्ये झळकावी ज्ञान,
कर्म, भक्ती स्वानुभावातून जन्मावा, प्रत्येक शब्द शब्दांमुळे दंगल, शब्दांमुळे मंगल शब्दांचे हे जंगल, जागृत रहाव.

**साक्षी मेश्राम**
**(B.Com I)**

# ONE MORE STEP

And yet again for another time I ve  Committed this sinful crime, I bought this cancer for 18 buks killing with its smoke that sucks.

And yet again, I drove my car through the city emittingthose follutants without any pity this is my world, it I live I care littile about survival, in comfort I belive

Neither I am cautious abour the dying nature nor bothered about desediting future so ii cut down that one more faithful tree Which was ought to provide life with its free.

Instead of saving burity of water, air I think using purifier enough is fair so hell-bent I am on demdishing God's treasure, urbanization is a my ultimate pleasure.

Everyday, I admire the industrial gradeur Gods watching me get poorer and poorer isn't it one more step. To wards abliuion, this sweet escape? May be we all love decorative our griaves so much in choose, so last , we are slaves cheers. Finally we have created a different world accomplished so much to create a netherworld.

**आकांक्षा मानकर**
(B.Com I)

## सुविचार

स्वप्न जिथे साकार होते,
जीवन तेथेच आकार होते.
जेव्हा स्वप्नातली
कल्पना आणि कल्पनेतील स्वप्ने
सत्यात उतरवतात,
तेव्हाच जीवन खऱ्या
अर्थाने परिपुर्ण होते.

स्वप्ने डोक्यात साठवुन ठेवु नयेत,
कदाचित ती अश्रुं
बरोबर वाहुन जातील....
ती हृदयात जपुन ठेवावीत
कारण, हृदयाचा प्रत्येक ठोका,
ही स्वप्ने पुर्ण करण्याची
प्रेरणा देईल.

आयुष्य खुप थोडं असतं
त्यात आपल्याला
खुप काही हवं असतं
जे हवं असतं, ते मिळतं
नसतं आणि ते मिळालं
तरी खुप काही
कमी असतं,
कारण चांदण्यांनी भरुन सुद्धा आपलं आभाळ
रिकामचं असतं!



**सिमरन पठान**
(B.A I)

# WILLIAM SHAKESPEARE



*William Shakespeare said: I always feel happy, you know Why? Becouse I don't expect Anything from anyone, Expectations Always hurt. Life, be hapy...& Keep smiling..just live for Yourself& before you speak, listen Before you write think before you Spend, earn. Before you pray, Forgive before you hurt, feel Before you hate, love. Before you Quit, try before you die, live.*

William shakespears was an English poet,playwright and actor he was born on 26th April 1564 in Stratford-upon-Avon. His father was successful local businessman and his mother was the doughter of a landeowner. Shakshpeare is widely regarded as the gratest writer in the English languadge and the world's preeminent dramalist. He is often called England's national poet and nicknamed the Bord of Axon. He wrote about 38 plays, 154 sonnets, two long narrative poems, and a few other users, of which the athourship of some in uncertain. His plaus have been translated into evry major living languadge and are performed more often than those of any other playwright.

*"love me or hate me, Both are in my farever...*
*If you love me, I will always be in your heart...*
*If you hate me, I will always be in your mind...*

**Marriage and career**

Shakshpeare married Anne hathway at the age of 18. She was eight years older than him. They had three children susanna, and twins hamnet and Judith. After his marriage information about his life become very rare. But he is tought to have spent most of his time in London writing and performing in his plays. Between 1585 and 1592, he began a successful career in London as an actor, writer and part owner of a playing company called the lord chamberlain's men later known as the king's men.

**"it is not in the stars to hold our desting but ourselves."**

**Retirement and death**

Around 1613, at the age of 49 he retired to Stratford,where he died three year later, few records of shakespear's private life survive. He died on 23rd April 1616, at the age of 52. He died within a month of sigening his will a document which he being by describing himself as being in " Perfect health " in his will, Shakespeare left the bulk of his large estate to his elder doughter Susanna.

"We know what we are, But know not what we may be"

**His work**

Shakespeare producted most of his known work between 1589 and 1613. His early plays were mainly comedies and histories and these works remain regarded as some of the best work produce in these genres. He then wrote mainly tradies until about 1608. Including Hamlet, Othello, king lear, and Macketh, Considrd soe of the finest works in the English language. In his last phase he wrote tragicomedies, also known as remances, and collaborate with other playwrights.

**"love all, trust a few, Do wrong to none."**

Shakespeare's plays remain highly popular today and are constantly studied.perfomed and reinterpreted in diverse culture and political conterts throughout the world.

**"have more than you show, Speak less than you know."**

**अबोली मुन**
**(B.Com I)**

# संत कबीर



कबीर हिंदी साहित्य के महिम मांडीत व्यक्तित्व है। कबीर के जन्म के संबंध मे संबंध मे अनेक किंवदन्तियाँ है। कुछ लोगो के अनुसार वे रामानंद स्वामी के आशिर्वाद से काशी की एक विधवा ब्राम्हणी के गर्भ से पैदा हुए थे, जियको भूल से रामानंद जी ने पूत्रवही होने का आशिर्वाद दे दिया था। ब्राम्हणी उस नवजान शिशु को लहाराता ताल के पास फेंक आयी।

कबीर के माता पीता के विषय मे एक राय निशिचत नही है की कबीर 'नीमा' और 'निरू' की वास्तविक संतान थे या निमा और निरू ने केवल इनका पालन-पोषण ही किया था। कहा जाता है कि निरू जुलाहे को यह बच्चा लहराता ताला पर पडा पाया, जिसे वह अपने घर ले आया और उसका पालन-पोषण किया। बाद में यही बालक कबीर कहलाया।

कबीर ने स्वयं को जुलाहे के रूप मे प्रस्तुत किया है।

**''जाती जुलाहा नाम कबीरा**
**बनी बनी फिरो उदासी।''**

कबीर पंथियो की मान्यता है की कबीर की उत्पत्ती काशी में लहराता तलाब में उत्पन्न कमल के मनोहर पुष्प के उपर बालक के रूप में हुई। ऐसा भी कहा जाता है कि कबीर जन्म से मुसलमान थे और युवावस्था में स्वामी रामानंद के प्रभाव से उन्हे हिंदू धर्म का ज्ञान हुआ। एक दिन कबीर पंच्चगंगा घाट की सीढीयों पर गिर पडे थे रामानंद जी उसी समय गंगास्नान करने के लिए सीढीयाँ उतर रहे थे कि उनका पैर कबीर के शरीर पर पड गया। उनके मुख से तत्काल 'राम-राम' शब्द  निकल पडा। उसी राम को  कबीर ने दिक्षामन्त्र मान तिया और रामानंद जी को अपना गुरू स्वीकार कर लीया।

**कबीर के ही शब्दो में-**

हम कासी मे प्रकट भये है रामानंद चेताए। अन्य जनश्रुतियों से ज्ञान होता है कि कबीर ने हिंदु मुसलमान का भेद मिटा कर हिंदु भक्तो तथा मुसलमान फकीरों का सत्संग किया और दोनों की अच्छी बातों को आत्मसात कर लिया।

जनश्रुती के अनुसार के अनुसार कबीर एक पुत्र कमल तथा पुत्री कमाली थी। इतने लागों की परवरिश करने के लिए उन्हे अपने करधे पर काफी काम करना पडता था। साधु संतो का तो घर में जमावडा रहता ही था।

कबीर को कबीर पंथ मे बाल ब्रम्हचारी और विराणी माना जाता है। इस पंथ के अनुसार कमाल उसका शिष्य था। और कमाली तथा कोई उनका शिष्य कोई शब्द का प्रयोग कबीर ने एक जगह कंबल के रूप में भी किया है। वस्तुतः कबीर की पत्नी और संतान दोनों थे। एक जगह कोई पुकार कर कबीर कहते है।

**''कहत कबीर सुनहु रे कोई।**
**हरी बिन राखन हार न कोई।।**

**कबीर पढे लिखे नही थेः**

**'मासे कागद छुवो नही, कलम नही नही हाथ।'**

कबीर के नाम से मिले ग्रंथो की संख्या भिन्न-भिन्न लेखो के अनुसार भिन्न-भिन्न है। एच-एच विल्सन के अनुसार कबीर के नाम पर आठ ग्रंथ है. जी एच वेस्टकॉट ने कबीर के ८४ ग्रंथो की सुची प्रस्तुत की तो रामदास गौड ने हिंदुत्व मे ७१ पुस्तके गिनायी है कबीर परमात्मा को मित्र माता, पीता और पति के रूप में देखते है। यहीं तो मनुष्य के सर्वाधिक निकट रहते है। वे कभी कहते है।

**हरीमोर पिउ मै राम की बहुरिया'**
**तो कभी कहते है,**
**हरी जननी मै बालक तोरा।**

कबीर को शांतीमय जीवन प्रीय था और वे अहिंसा, सत्य, सदाचार आदी गुणों के प्रशंसक थे। अपनी सरलता, साधु स्वभाव तथा संत प्रवृत्ती के कारण आज विदेशो मे भी उनका समादर हो रहा है। कबीर का पुरा जिवन काशी मे ही गुजर लेकीन वह मरने के समय मगहर चले गऐ थे। वह न चाहकर भी, मगहर गए थे वृध्दावस्था मे यश और किर्ती की मार ने बहुत कष्ट दिया। उसी हालात में उन्होंने बनारस छोडा और आत्मनिरीक्षण तथा आत्मपरीक्षण करने के लिए देश के विभीन्न भागो की यात्राए की। कबीर मगहर जाकर दुःखी थे।

**''अबकहु राम कवन गति मोरी।**

**त्जीले बनारस मती नई मोरी।।''**

कहा जाता है की कबीर के शत्रुओं ने उनको मगहर जाने के लिए मजबूर किया था। वे चाहते थे कि कबीर की मुक्ती न हो पाए परंतु कबीर तो काशी मरण से नही राम की भक्ती से मुक्ति पाना चाहते थे।

**''जो काशी तन तजै कबीरा।**
**तो रामै कौन निहोरा।''**

अपने यात्राक्रम में ही वे कालींजर जिले के पाथौराबाद शहर में पहुँचे। वहाँ रामकृष्ण का छोटा सा मंदीर था। वहाँ के संत भगवान गोस्वामी जिज्ञासु साधक थे किंतु उनके तर्को का अभी तक पुरी तरह समाधान नही हुआ था। संत कबीर से इनका विचार-विनीमय हुआ। कबीर की एक सखी ने उन के मन पर गहरा असर किया।

'बन ने भागा बिहरे पडा, करहा अपनी बान।
करहा बेदन कासों कहे, को करहा को जाना।

वन से भाग कर बहेलिए हे द्वारा खाए हुए गड्डे में गिरा हुआ हाथी अपनी व्यथा किस से कहे? सारांश यह की धर्म की जिज्ञासा सें प्रेरीत हो कर भगवान गोसाई अपना घर छोड कर बाहर तो निकल आए और हरीव्यासी साम्प्रदाय के गड्डे में गिर कर अकेले निर्वासित हो कर ऐसी स्थिती में पड चुके है।

कबीर आडम्बरो के विरोधी थे। मुर्तिपुजा को लक्ष्य करती एक सीखा है।

पाहन पूजे हरी मिले तो मै पुजौपहार था ते तो चाकी भली जीसे पीसी खाय संसार।

११ वर्ष की अवस्था मे मगहर में कबीर का देहांत हो गया । कबीरदास जी का व्यक्तित्व संत कवियों मे अद्वितीय है। हिंदी साहित्य के १२०० वर्षो के इतिहास में गोस्वामी तुलसीदास जी के अतिरीक्त इतना प्रभावशाली व्यक्तित्व किसी कवि का नही है।

**अंकिता देशमुख**
**(B.Com I)**

## वहीचं शेवटचं पान

कुणी रेखाटलं, कुणी फाडलं
कुणी उगाचच व्यंग काढतं
कुणीच ठेवत नाही ज्याचा मान
असं ते वहीचं शेवटच पान

कवी लिहीतात गाणी अन् चारोळ्या
मुली काढतात छान छान रांगोळ्या
सहन करतं जे सर्वांचा ताण
असं ते वहीचं शेवटचं पान

प्रेमी लिहीतात त्यावर प्रेमपत्र
चित्रकार काढतात असतं ते कच्च लिखाण
असं ते वहीचं शेवटचं पान

पाण्यावर तरंगतात बनून होडी
पुठ्याची अन् त्याची साथच थोडी
कधी उडतं हवेत बनून विमान
असं ते वहीचं शेवटचं पान

गरिबांच पोर ते हि वाचवंत
पुढे कामी येईल म्हणुन साचवतं
कारण त्यांनाच असते गरिबीची जाण
असं ते वहीचं शेवटचं पान



**स्वयंवरी ढोले**
**(B.Com I)**

# अण्णाभाऊ साठे



तुकाराम भाऊराव साठे ऑगस्ट १ इ.स. १९२०-जुलै १८ इ.स. १९६९ हे अण्णाभाऊ साठे म्हणून ओळखले जाणारे एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक होते. साठे एका अस्पृश्य मांग समाजामध्ये जन्मलेल एक दलित व्यक्ती होते, आणि त्यांची उपज आणि ओळख त्यांचे लेखन राजकिय कृतीशीलतेचे केंद्रबिंदु होते.

**वैयक्तिक जीवन**

अण्णाभाऊ साठेंचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यात वाळवा तालुक्यातील पाटेगाव या गावी झाला. त्यांच्या वडीलांचे नाव भाऊराव सााठे व आईचे नाव वालुबाई साठे होते. साठे हे शाळेत शिकलेले नाही, केवळ दीड दिवस ते शाळेत गेले. नंतर तेथील सर्वांद्वारे होणाऱ्या भेदभावामुळे त्यांची पहीली पत्नी कोंडाबाई साठे तर दुसरी जयवंता साठे या होत. त्यांना एकुण तीन अपत्ये होती-मधुकर, शांता आणि शकुंतला.

**लेखन**

साठे यांनी मराठी भाषेत ३५ कादंबऱ्या लिहील्या. त्यामध्ये फकिरा १९६१ समाविष्ट आहे, जी १९ व्या आवृत्तीत आहे. आणि इ.स. १९६१ मध्ये राज्य सरकारच्या उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला आहे. साठेंच्या लघु कथांचा संग्रह १५ आहे. ज्यामध्ये मोठ्या संख्येने बऱ्याच भारतीय भाषांमध्ये आणि अभारतीय भाषांमध्ये भाषांतरीत केल्या गेल्या आहेत. २७ कादंबरी आणि लघुकथा यांच्याव्यतिरीक साठे यांनी नाटक, रशियातील भ्रमंती. १२ पटकथा आणि मराठी पोवाडा शैलीतील १० गाणी लिहीली.

साठेंच्या पोवाडा आणि लावणी यांसारख्या लोककथात्मक कथा शैलींच्या वापराने लोकांमध्ये ते लोकप्रीय बनले व त्यांचे कार्य अनेक समुदायांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखनीला अर्पण केलेल्या 'फकीरामध्ये साठेंनी आपल्या समुदायाला पुर्ण भुकमारीपासुन वाचवण्यासाठी ग्रामीण रूढीवादी प्रणाली आणि ब्रिटीश शासनाच्या विरूद्ध विद्रोह करणाऱ्या नायक फकिराला चित्रीत केले. नायक आणि त्यांच्या समुदायाला नंतर ब्रिटीश अधिकारी द्वारे अटक आणि छळ दिला जातो. आणि अखेरीस फकिराला फाशी देऊन ठार मारले जाते. मुंबई मधील शहरी पर्यावरणाने त्यांच्या लिखाणावर लक्षणीय प्रभाव टाकला. जे याला डायस्टोपीयन परीवाराच्या रूपात दर्षवतात आरती वाणीने त्यांच्या दोन गायनातून ''मुंबईची लावणी'' आणि ''मुंबईचा गिरणीकामगार'' दुर्व्यवहारी, शोषणकारी, आसमान और अन्यायपुर्ण असे शहराला दर्शवणारे वर्णन केले आहे.

**राजकारण**

साठे पहिल्यांदा कम्युनिस्ट विचारसारणीने प्रभावित होते. डी.एन. गवंकर आणि अमर शेख या लेखकांसोबत ते लालाबावटा कला पथक या तमाशा नाट्यप्रसाराचे सदस्य होते. ज्याने सहकारी निर्णयांना आव्हान दिले होते. ते १९४० च्या दशकामध्ये कार्यरत राहिले आणि तेवीया अब्राम्स यांच्यानुसार, भारतातील साम्यवादाच्या आधी स्वातंत्र्यांच्या नंतरची ''१९५० च्या दशकातील सर्वात रोमांचक नाटकीय घटना'' होती. भारतीय स्वातत्र्यानंतर उच्चवर्णीयांचे भारतावरील शासन त्यांना मान्य येथे वीस हजार लोकांचा मोर्चा काढला आणि त्या मोर्च्यातील घोषणा होती, ''ये आजादी झुटी है, देश कि जनता भुखी है।'' इंडियन पीपल्स थिएटर एसोसीएशनमध्येही ते एक महत्त्वपुर्ण व्यक्तिमत्त्व होते. जी भारतीय कम्युनिस्ट पक्षाची एक सांस्कृतीक शाखा होती आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये, ज्याने भाषीक विभागातून वेगळे मराठीभाषी राज्य बॉम्बे राज्य निर्माण करण्याची मागणी केला होती.

साठे नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकींना अनुसरत दलित कार्याकडे वळले आणि दलित व कामगारांच्या जीवनातील अनुभवांना प्रकट करण्यासाठी त्यांच्या कथांचा वापर केला. इ.स. १९५८ मध्ये, बॉम्बेमध्ये स्थापन केलेल्या पहिल्या दलित साहीत्य संमेलनात आपल्या उद्घाटन भाषणात त्यांनी म्हटले की, ''पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसुन दलित व कामगार लोकांच्या तळहातावर तरलेली आहे.'' यातून त्यांनी जागतिक संरचनांमध्ये दलित लेखकांच्या विपरीत, साठेंचे कार्य बौध्द धर्माऐवजी मार्कसवादाच्या प्रभावाखाली होते. त्यांनी म्हटले आहे की, ''दलित लेखकांना सध्याच्या सांसारीक व हिंदु अत्याचारांपासुन दलितांना मुक्त करणे आणि त्यांचे संरक्षक करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. कारण दीर्घकालीन पारंपारीक श्रध्दांना त्वरीत नष्ट केले जाऊ शकत नाहीत.

**वारसा**

साठे हे दलित समाजाचे विशेषत: मांग जातीचे प्रतीक बनले. १ ऑगस्ट २००१ रोजी भारतीय पोस्टाने विशेष रू.४ टपाल तिकीटांवर साठेंचे चित्र ठेवले होते. पुण्यातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक आणि कुर्ला मधील एक उडाणपुल यासह अनेक इमारतींना नाव देण्यात आले.

**संगीता मोरे (B.A III)**

# वि.दा. करंदीकर



**जीवनप्रवासः**

गोविंद विनायक करंदीकर उर्फ वि.दा. करंदीकर यांचा जन्म २३ आगस्ट १९१८ ला सिंधुदुर्ग येथील घालवली या गावी झाला. ते मराठीतील ख्यातनाम कवी लेखक व समीक्षक होते. देशाच्या साहित्य क्षेत्रातला सर्वोच्च प्रतिष्ठेचा ‘ज्ञानपीठ पुरस्कार’ त्यांना ‘अष्टदर्शने’ या साहीत्यकृतीसाठी प्रदान करण्यात आला. वि.स. खांडेकर आणि कुसुमाग्रजांनतर हा पुरस्कार मिळावणारे ते तिसरे मराठी साहित्यिक ठरले. याशिवाय करंदीकरांना महाराष्ट्र साहित्य परीषद पुरस्कार, कुसुमाग्रज पुरस्कार, कबीर सन्मान, जन्मस्थान पुरस्कार यासारखे अनेक सन्मान व पुरस्कार देण्यात आले.

वि.दा. नी त्यांचे शिक्षण कोल्हापूर येथे पुर्ण केले. हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला आणि त्यासाठी तुरूंगवासही भोगला. कोकणाच्या आर्थीक मागासलेपणाबद्दल ते संवेदनशील होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ते मार्क्सवाद असा त्यांचा वैचारीक प्रवास राहीला. पण ते अशा कोणत्याही संघटनेचे सभासद राहीले नाहीत अर्थार्जनासाठी त्यांनी अध्यापन स्विकारले. बसवेश्वर कॉलेज रत्नागीरी, रामनारायण रूईया महाविद्यालय मुंबई इत्यादी महाविद्यालयांमध्ये ते इंग्रजी विषयाचे प्रध्यापक होते. केवळ लेखन करण्यासाठी इ.स. १९१८ सालामध्ये त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली. त्यांचे वैयक्तिक जीवन साधे, स्वावलंबी राहीले. काटेकोरपणाबद्दल त्यांची भुमिका नेहमी आग्रही राहीली.

**वि.दा. चे समग्र वाङमयः**

विदांनी मराठी काव्यमंजुषेत विविध घराच्या रंजक व वैचारीक काव्यलेखनाची भर घातली, मराठी बालकवीतेची मुहुर्तमेढ रोवली. विदा, मंगेश पाडगावकर आणि वसंत बापट या जेष्ठ कविंनी संपूर्ण महाराष्ट्रात एकत्रित काव्यवाचनाचे असंख्य कार्यक्रम करून कविता जनसामान्यांपर्यंत पोहचतील असे पाहिले. विदांचे पहीले काव्यवाचन आचार्य भागवत यांच्याकडे झाले. इ.स. १९४९ साली पुण्यात भरलेल्या मराठी सहित्य संम्मेलनातील पहिल्य जाहीर काव्यवाचनाने त्यांचा मराठीभाषकांस परीचय झाला.

**काव्यसंग्रह**

| | | | |
|---|---|---|---|
| धृपद | (इ.स. १९५९) | जातक | (इ.स. १९५९) |
| विरूपीका | (इ.स. १९५९) | अष्टदर्षने | (इ.स. १९५९) |
| स्वेदागंगा | (इ.स. १९५९) | मृद्‌गंध | (इ.स. १९५९) |

बालकविता संग्रह:

| | |
|---|---|
| एकदा काय झाले | (इ.स.१९६१) |
| राणीचा बाग | |
| एटू लोकांचा देश | (इ.स.१९६३) |
| सशांचे कान | |
| परी ग परी | (इ.स.१९६५) |
| अजबखाना | (इ.स.१९७४) |
| सर्कसवाला | (इ.स.१९७५) |
| पीशीमावशी आणि तिची भुतकाळ | (इ.स.१९८१) |
| अडम तडम | (इ.स.१९८५) |
| टॉप | |
| बागुलबोवा | (इ.स.१९९३) |
| सात एके सात | |

**विदांच्या कवितांविशयी :**

विदा करंदीकरच्या कवितेत एकाच वेळी सामर्थ्य आणि सुकोमलता, विमुक्तपणा आणि संयम, अवखळपणा आणि मार्दत, गांर्भीय आणि मिस्कीलपणा आणि प्रगाढ वैचारीकते बरोबरच नाजूक भावसौंदर्य यांचा एकदम प्रत्यय येतो. कधी कधी त्यांची कविता कड्यावरून

आपले अंग झोकून देणाऱ्या जलप्रपातासारखी खाली कोसळताना दिसते. अशावेळी तिचा जोश, तिचा नाद, तिचे सामर्थ्य, तिची अवखळ झेप पाहता ऐकता क्षणीच आपले मन वेधुन घेते. तर कधी कधी लपत छपत हिरवळीतून वाहणाऱ्या एखाद्या झुळझुळ ओढ्याप्रमाणे ती अंग चोरून नाजुकपणे आवरताना आढळते. प्रमत्त्व पुगवांची मुसंडी आणि हरिणशावकांची नाजुक हालचाल, दगडगोट्यांनी भरलेली विस्तीर्ण माळराने आणि तुरळक नाजुक रानफुलांनी नटलेली लुसलुशीत हिरवळ, गौतमबुध्दांची ध्यानमग्न मुर्ती आणि जातीवंत विदुषकांची मिस्कील नजर यांची एकदम किंवा एकामागून एक आठवण व्हावी असेच तिचे रूप आहे.

**पुरस्कार**

| | |
|---|---|
| कबीर सन्मान | (१९९१) |
| कवी कुसुमाग्रज पुरस्कार | (१९८७) |
| कुमारन आसन पुरस्कार | (१९७०) |
| केशवसुत पुरस्कार | |
| कोणार्क सन्मान | (१९९३) |
| जन्मस्थान पुरस्कार | (१९९३) |
| भारतीय भाषा परीषद सह्याद्री पुरस्कार | (१९९९) |
| महाराष्ट्र फाउंडेशन गौरव पुरस्कार | (१९९७) |
| महाराष्ट्र साहित्य परिषद पुरस्कार | (१९८५) |
| साहित्य अकादमी पुरस्कार | (१९९६) |
| सोव्हीएत लॅन्ड नेहरू लिटररी पुरस्कार | (१९७०) |
| ज्ञानपीठ पुरस्कार | (२००३) |

**विदांविषयी मान्यवरांचे विचारः**

शंकर वैद्य यांच्या मते विदा करंदीकरांची जीवनविशयक दृष्टी ही कठोर बुद्धीवादी, पूर्णपणे वास्तवशील आणि नितांत ऐहिक स्वरूपांची आहे. मंगेश पाडगावकर यांच्या मते करंदीकरांची कविता प्रयोगशील आहे. त्यांचे सामाजिक राजकिय तत्वज्ञान मार्क्सिक्ट संस्काराचे होते. त्यामुळे प्रचाराचे बांडगुळ टाळून सामाजिक, राजकिय, कविता लिहीणे कठीण होते पण विदांमधल्या कलावंताने हे आव्हान यशस्वीपणे पेलले.

**मयुर वटाणे**
**(B.A II)**

## जिंकण्यासाठी जन्म

जिंकण्यासाठी जन्म माझा, मी पुढे चालणार
झटकूनी मरगळ सारी, आनंदीत राहणार

झालेत कितीही कष्ट, अन रस्त्यात असंख्य बाधा
तरीही जिंकणार मी, प्रबळ आत्मविश्वास माझा

कर्म हीच पूजा, अन ध्येय हेच दैवत
ध्येय प्राप्तीसाठी, प्रयत्न माझे अविरत

वेडावूनी जिंकण्यासाठी, लढीन अवघ्या जगताशी
आशेच्या या मार्गावर मी, पुन्हा सांगतो जन्म माझा जिंकण्यासाठी



**नेहा चरडे**
**(B.Com I)**

# सुभद्राकुमारी चौव्हान



सुभद्राकुमारी चौव्हान १६ ऑगस्ट १९०४-१५ फरवरी १९४८ हिंदी की सुप्रसिध्द कवयीत्री और लेखीका थी। उनके दो कविता संग्रह तथा तीन कथा संग्रह प्रकाशित हुए। घर उनकी प्रासिध्द झांसी की रानी कविता के कारण है। ये राष्ट्रीय चेतना कि एक सजग कवयीत्री रही है। किंन्तु इन्होने स्वाधीनता संग्राम मे अनेक बार जेल यातनाएं सहने के पश्चात् अपनी अनुभूतियो को कहानी में भी व्यक्त किया। वातावरण चित्रण प्रधान शैली की भाषा सरल तथा काव्यात्मक है। इस कारण इनकी रचना की सादगी हृदय-ग्राही है।

**जीवनपरिचयः**

सुभद्राकुमारी चौव्हान यांचा जन्म १६ ऑगस्ट १९०४ रोजी निहालपुर इलाहाबाद उ.प्र.येथे झाला. १५ फरवरी १९४८ रोजी जबलपूर मध्यप्रदेश मे उनका निधन हुआ।

उनका जन्म नागपंचमी के दिन इलाहाबाद के निकट निहालपूर नामक गाँव मे रामनाथसिंह के जमीदार परीवार मे हुआ था। बाल्यकाल से ही वे कविताएँ रचने लगी थी। उनकी रचनाएँ राष्ट्रीयता की भावना से परिपुर्ण है। सुभद्रा कुमारी चौहान चार बहने और दो भाई थे। उनके पिता ठाकूर रामनाथसिंह शिक्षा के प्रेमी थे और उन्ही कि देख-रेख में उनकी प्रारंभिक शिक्षा भी हुई १९१९ में खण्डता के ठाकूर लक्ष्मण सिंह के साथ विवाह के बाद वे जबलपूर आ गई थी। १९२१ में गांधी जी के असहयोग आंदोलन मे भाग लेने वाली प्रथम महिला थी। वे दो बार जेल भी गई थी।

सुभद्राकुमारी चौव्हान की जीवनी,इनकी पुत्री सुधा चौव्हान ने ''मिला तेज से तेज'' नामक पुस्तक में लिखी है। इसे हंस प्रकाशन इलाहाबाद ने प्रकाशित किया है। वे एक रचनाकार होने के साथ-साथ स्वाधीनता संग्राम की सेनानी भी थी।

डॉ. मंगला अनुजा की पुस्तक सुभद्रा कुमारी चौहान उनके साहित्यीक व स्वाधीनता संघर्ष के जीवन पर प्रकाश डालती है। साथ ही स्वाधीनता उनके कविता के जरीए नेतृत्व को भी रेखांकित करती है। १५ फरवरी १९४८ को एक कार दुर्घटना मे उनका आकस्मिक निधन हो गया था।

**कथा साहित्य**

''बिखरे मोती'' उनका पहला संगह है। इसमे भग्नावशेष, होली, पापी पेट मंझली रानी परीवर्तन, दृष्टीकोन, कदम के फूल किस्मत, मदुसे की बेटी, एकादशी, आहुती, याती, अमराई, अनुरोध व ग्रामीण कूल १५ कहानियाँ है। इन कहानियों की भाषा सरल बोलचाल की भाषा है। अधिकांश कहानियाँ नारी विमर्श पर केंद्रित है।''उन्मादिनी'' शीर्षक से उनका से उनका दुसरा कथा संग्रह १९३४ में छपा। इसमें उन्मादिनी असमंजस, अभियुक्त, सोने की कंठी नारी हृदय, पवित्र ईर्ष्या अंगुठी की खोज चढा दिमाग व वेश्या कि लडकी कुल ९ कहानियाँ है। इन सब कहानियों का मुख्य स्वर पारिवारीक सामाजिक परीदृश्य ही है।

''सीधे-सीधे चित्र'' सुभद्रा कुमारी चौहान का तीसरा व अंतिम कथा संग्रह है। इसमें कुल १४ कहानियाँ है। रूपा, कैलाशी, नानी, कल्याणी, दी साथी, प्रोफेसर मित्रा दुराचारी व मंगला-८ कहानियों की कथावस्तु नारी प्रधान पारंपारीक सामाजिक समस्याये.

हिंगवाला राही तांगेवाला और गुलाब सिंह कहानियाँ राष्ट्रीय विषयो पर आधारीत है। सुभद्रा कुमारी चौहान ने कुल ४३ कहानियाँ लिखी और अपनी व्यापक कथा दृष्टी से वे एक अति लोकप्रिय कथाकार के रूप में हिंदी जगत मे सुप्रसिद्ध है।

**सम्मान पुरस्कार**

भारतीय तटरक्षक सेना ने २८ अप्रैल २००६ को सुभद्रा कुमारी चौहान की राष्ट्रप्रेम की भावना की सन्मानित करने के लिए नए नियुक्त एक तटरक्षक जहाज को सुभद्रा कुमारी चौहान का नाम दिया।

भारतीय डाकतार विभाग ने ६ अगस्त १९७३ को सुभद्रा कुमारी चौहान के सम्मान में २५ पैसे का एक डाक-टिकट जारी किया है। विभीन्न प्रकार को पुरस्कार कवियीत्री सुभद्रा कुमारी चौहान को मिले।

**कृतियाँ**

| | | |
|---|---|---|
| **कहानी संग्रहः** | बिखरे मोती | (१९३२) |
| | उन्मादिनी | (१९३४) |
| | सीधे साधे चित्र | (१९४७) |
| **कविता संग्रहः** | मुकुल | |
| | त्रिधारा | |

**प्रसिध्द पंक्तियाँः**

यह कदम्ब का पेड अगर माँ होता यमुना तीरे। मै भी उस पर बैठ कन्हैया बनता धीरे धीरे।।

सिंहासन हिल उठे राजवंशो ने भुकुटी तानी थीं, बुढे भारत मे भी आई फिर से नयी जवानी थी।

गुम हुई आजादी की किमत सबने पहचानी थी, दूर फिरंगी को करने कि सबने मन में ठानी थीं।।

मुझे छोडकर तुम्हे प्राणधन, सुख या शांति नही होगी, यही बात तुम भी कहते थे, सोचो भ्रांती नही होगी।।

**जीवनी**

मिला तेज से तेज झांसी की रानी कविता इस कविता कि कुछ पंक्तियाँ:

महान कवयीत्री सुभद्रा कुमारी चौहान के द्वारा लिखी गयी कविता झाँसी की रानी के कुछ शुरूवाती पंक्तियाँ:

सिंहासन हिल उठे राजवंशो ने भुकुटी तानी थी, बुढे भारत में आई फिर से नयी जवानी थी,

गुम हुई आजादी कि किमत सबने पहचानी थी, दुर फिरंगी को करने कि सबने मन में ठानी थी,

चमक उठी सन सन्तावन में वह तलवार पुरानी थी, बुंदेले हर बोलों के मुँह, हमने सुनी कहानी थी,

खुब लडी मर्दानी वह तो झाँसी वाली रानी थी।।

**विशेष**

सुभद्रा कुमारी चौहान के साहित्य में जो स्वभाविक सरलता है और जो अहेतुक गंभीर मुद्रा का खटकता सा लगने वाला अभाव है। उसका कारण है, जीवन के उस मौलिक उद्वेग का राग जिसने समाज मे भिन्न-भिन्न रूप धारण किए। राष्ट्रीय आन्दोलन उसका एक रूप था, उसकी एक अभिव्यक्ति थी स्त्रियों की स्वाधीनता का प्रश्न उसका दुसरा रूप था। उसकी एक अभिव्यक्ती थी, स्त्रियों की स्वाधीनता दुसरा रूप था और पतित जातीयों का उत्थान तीसरा। कुछ विशेष अर्थो मे सुभद्रा जी का राष्ट्रीय काव्य हिंदी में बेजोड है।

क्योंकि, उन्होने उस राष्ट्रीय आदर्श को जीवन मे समाया हुआ देखा है। सुभद्रा कुमारी चौहान नारी के रूप मे ही रहकर साधारण नारीयों की अकांक्षाओं और भावों को व्यक्त करती है। बहन माता, पत्नी के साथ-साथ एक सच्ची देश सेविका के भाव उन्होने व्यक्त किए है। उनकी शैली में वही सरलता है। वही अकृप्रिमता और स्पष्टता है, जो उनके जीवन में है।

**रविणा चौंव्हान**
**(B.Com I)**

## व्यथा स्त्रीची

संसाररूपी रथाचं दुसरे चाक स्त्रीला म्हंटल जात
पण धावायला निघालेल्या चाकाला कुठ तरी ब्रेक दिलं जातं

तिलाही काहीतरी विचार भावना असते म्हणतात
पण विचार करणारे श्वासच तिचे कोंडले जातात

लज्जा शरम हा तर तिचा स्थायी भावन आहे
पण तिच्या या स्थायी भावावर वासनेचा प्रतिकार होत आहे

जिकडे जावे तिने तिकडे तिच्यावर नजरचं आहे
समाजात तर आज मानवतेचीच कमी आहे

स्वीत्वांचा उदो उदो करणारे काळाच्या पडद्याआड गेले
त्यांचीच वाट जोपासणारे आज बेईमान झाले

पण याचं स्त्रीची कुठं कुठं आज दयनीय अवास्था आहे
तिच्याकडे पाहण्यासाठी लागणारें डोळेच लुप्त झाले आहे



**रूपाली देवतळे**
**(B.Com II)**

# साने गुरूजी



**जन्म २४ डिसेंबर १८९९ व मृत्यू ११ जून १९५०**

बाल वयात मुलांच्या मनावर जे संस्कार होतात ते आयुष्यभर त्यांची सोबत करतात. हे लक्षात घेऊन आई वडिलांनी मुलांवर चांगले संस्कार करायला पाहिजेत. पुज्यनीय साने गुरूजी यांना सुदैवाने तसेच आवडिल लाभले होते.

त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी दापोली तालुक्यातील पालगड या गावी झाला हे गाव रत्नागिरी जिल्ह्याात येते. त्यांचे पुर्ण नाव पांडुरंग सदाशिव राणे, पण त्यांना घरी पंढरी म्हणत. त्यांची आ यशोदाबा, वडिल सदाशिवराव हे पंढरीचे योग्य तर्हेने संगोपन करत ते प्रथम पालगड च्या शाळेत शिकलें त्यांचे वडिल त्यांच्या शिक्षणात फार दक्ष होते. तसेच यशोदाबाने लहानपणी त्यांच्या वर फार मोलाचे संस्कार केले. सालस, गुणी, कष्टाळू आणि सात्विक मनोवृत्ती असलेल्या पंढरीचे पुढे 'गुरूजी' हीच ओळख झाली. लहान वयातील शारीरिक-मानसिक जडण घडण करण्याची जबाबदारी हि मुख्यतः आवरच पडते. त्यांची आई तशीच होती. त्या म्हणाल्या पायाला घाण लागु नये म्हणुन जवतोस तसेच मन घाण होऊ नये म्हणुनही जप हो! खोटे कधी बोलू नको, कोणत्याही प्रकारचे काम करण्याची लाज बाळगु नको अशा अनेक गोष्टी त्यांना लहान वयात रूजवण्यात आल्या. त्या प्रेम करीता, पण चुकी झाल्यास कठोर शिक्षा देत असत त्यामुळे मोठेपणी ते सत्यनिष्ठ, परोपकारी, प्रामाणिक बनले.

पालगडचे पाच वर्ग शिक्षण झाल्यानंतर ते मामाकडे पुण्याला गेले, तेथे त्यांनी अनेक धार्मिक पोथी-पुराने यांचे वाचन केले पण आईकडे जाण्याच्या इच्छेने ते परत पालगडला आले त्यासाठी त्यांना खुप बोलणी खावी लागली. पण ते भरपूर कामे करून आची मदत करीत असत त्यामुळे घरच्यांचा राग दूर करत. नंतर ते इंग्रजी शिक्षणाकरीता आत्याकडे दापोलीला राहिले तेथे त्यांनी आपली वचनाची हौस भागविली. संस्कृत, इंग्रजी, मराठी अशी अनेक पुस्तके त्यांना तेथे वाचनास मिळत त्यानंतर त्यांना माहिती पडले कि औधला मोफत शिक्षण व जेवण मिळते. तेव्हा घरच्या परवानगीने ते औंधला गेले. काही दिवसातच तेथे प्लेगची साथ आल्यामुळे ते परत आले नंतर ते पुण्याला गेले. १९२२ मध्ये बी.ए. ची पदवी उत्तीर्ण झाले. पुढे अमळनेरला तत्वज्ञान मंदिरात काम करित एम.ए. झाले. पुढे अमळनेरला नंतर खानदेश एजुकेशन सोसायटी शाळेत नोकरी मिळाली. मुलांना शिकविण्याची त्यांची पध्दत आणि त्यामागची कळकळ पाहुन उत्तम शिक्षण म्हणून प्रसिध्दी झाली. काही दिवस वसती गृहाचे काम चालविले मुलांना चांगले संस्कार देण्याची त्यांना संधी मिळाली. थोर पुरुशाचे चरित्रे लिहीले त्यावेळीच त्यांच्या मनात आपण देश्यासाठी काही तरी करावे असे वाटू लागले. नेत्यांची भाषणे, गांधीजींच्या चळवळी जनतेला मिळणारे संदेश या सर्व गोष्टींने त्यांच्या मनावर देशाविषयी भावना बळावल्या. नंतर १९३० मध्ये त्यांनी शाळा सोडली. आणि ते आश्रमात दाखल झाले. सत्याग्रहाच्या कामात भाग घेऊन भाषणे करू लागले त्यांच्या अमळनेरच्या भाषणात त्यांवर खटला भरण्यात आला. त्यांना १५ महिने शिक्षा झाली. त्यातही त्यांनी लोकशिक्षण, लेखन, स्फुर्तीगीते चालुच ठेवले स्वातंष्याचे आम्ही शिपाई **(Freedom Fighter)** दुखी सारख्या कथा, खरा सत्याग्रही **(Satyagrahi)** क्रांती, आस्तिक, अशा कथा कादंम्बरी, नाटके त्यांनी लिहिलीत. त्यांची शामची आई हि कादंम्बरी, नाटके त्यांनी लिहिलीत. स्वातंत्र्य लढ्याात भुमिगत राहुन त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेकांना प्रेरणा दिली.

आधी केले मग सांगीतले या विचारांचे ते होते. समाजात एकोपा केले राहावा असे त्यांना वाटे साधना साप्ताहिकांचे संपादन कुमार संम्मेलनाचे अध्यक्षपद, मंदिर प्रवेशाच्या निमीत्ताने पंढरपूरला प्राणांतिक उपोषण असे समाज कार्य कारताना त्यांनी कुमारांना संदेश म्हणून सांगितले देशी-विदेशी वाङमयाचा अभ्यास करा अनुवाद करा. सर्वत्र हिंडुन वाङमय गोळा करा. आणि देश, समाज याची सेवा करा. सेवा दलात त्यांनी प्रत्यक्ष कार्य केले होते. ते मनाने फार हळवे होते देशाच्या स्वातंत्र्यानंतर घडलेल्या काही घटनांनी अस्वस्थ झालेले गुरुजी **(Guruji)** अखेर ११ जून १९५० साली देवाघरी गेलेत.

**अथर्व तांबसकर**
**(B.Com I)**

# पु.ल. देशपांडे



पु.ल. देशपांडे कोण होते? हे विचारण्यापेक्षा काय काय होते हे विचारणे सयुक्तिक होत. लेखक नाट्या, ललिते प्रवास वर्णन, भाषणे-पटकथा लेखक, दिग्दर्शक, कवी, संगीत दिग्दर्शक, उत्तम रसनेचे खवय्ये, जाणकार श्रोते, शिक्षक आणि एक विद्यार्थी सुद्धा। पंडीत नेहरूंची दूरदर्शनच्या पहिल्या वहिल्या प्रसारणासाठी मुलाखत घेणारे पहिले मुलाखतकार पु.ल.च होते. रेडीओवरील भाषणे आणि श्रुतिका पण त्यांच्या हातातून सुटल्या नाहीत। आणि एक छान, उमदा माणुस। असे **All-in-one** व्यक्तिमत्व माझ्या पाहण्यात तरी नाही.

मी पु.ल. देशपांडे यांचा मोठा चाहता आणि छोटासा वाचक आहे. पण जितके वाचनालय त्यानेच मला आपलस केलय आणि आपण पु.ल. ना अनेक जन्मांपासून ओळखतो, ही भावना पण मनात रूजून गेलीयय. ते कधी परके वाटलेच नाहीत. बैठकीत अण्णा माझे वडिल सोबत रोज गप्पा मारत बसत असावेत असेच वाटते. पण असे त्यांच्या सगळ्याच वाचकांना वाटत असावे.

माझ्या वाचनात त्यांचे सगळेच्या सगळे साहित्य आलेले नाही. ‘व्यक्ती आणि वल्ली’, ‘असामी असा मी’, ‘बटाट्याची चाळ’, आणि ‘मराठी वाङमयाचा गाळीव इतिहास’ इतकीच वाचली आहेत. त्यामुळे मी त्यांचा ‘इतकाच’ वाचक आहे. पु.ल. नी विपुल लिखाण केल आहे. पण त्या पेक्षाही त्यांच्या लिखानासाठी इतरांनीच आधिक झरण्या झिजवल्यात त्यात अस्मदिक सुद्धा आहेत. पु.ल. च्याच भाषेत सांगायचे तर ‘नका पेक्षा’ उपऱ्या लेखनाचा मोतीच जड. पु.ल. म्हटल कि ‘व्यक्तीरेखाचा’ ब्रह्मदेव उभा राहतो ‘गणगोत’ ‘गुण गाईन आवडी’ ‘मैत्र’ हे त्यांनी आणि वल्ली’ या काल्पनिक व्यक्तींवर लिहीलय निखळ ‘कथा’ त्यांनी लिहल्या नसल्या तरी त्यांची प्रत्येक व्यक्तीरेखा हि एका अर्थी कथाच आहे. म्हणूनच मी माझे आवडते कथा लेखक यात पु.ल. ना घेऊन आलोय. त्यांनी फक्त कथा सुत्राऐवजी विनोदनिर्मीतीस प्राधान्य दिले आहे. त्या मुळे त्यांच्या लेखनात ‘कथा’ गौण ठरते. ‘म्हैस’ हे एकमेव कथा वाचवलीत पु.ल. ची म्हणून ती ग्रेट पण ‘कथा’ म्हणुन मला ती सुमास्य वाटली अगदी आजही! टासामी असा मी’, ‘बटाट्याची चाळ’ या जरी व्यक्तीरेखा नसल्यातरी त्यात ही अफलातून व्यक्तीचित्रण आहे. बटाट्याच्या चाळीचा ‘डोलारा’ तर अशाच आवलिया आणि व्यक्तीरेखाच्या ‘नगा’ वर उभा आहे!

मी त्यांच्या काल्पनिक व्यक्ती न पुर्तेच लिहीणार आहे अशी कोणती रासायनिक ने या व्यक्ती रेखांना ‘चिरंजीव, करून गेर्जीत? हा मला नेहमीच प्रश्न पडतो त्याची कोणतीही व्याक्तीरेखा घ्या झटकन डोळ्यापुढे उभी राहते खर तर त्यांच्या लेखनात त्या व्यक्तीचे बाह्यावर्णन नसतेच किंवा खुप सोटक असते जसे ‘होकायंत्रासारखे टोपी’ ‘मळखाऊ कोट’ किंवा ‘गुडग्याखाली दोन बोट धोतर’ असेच काहीसे वय उंची आकार यांचा उल्लेख नसतो काव्य कपाळ, कुरळे केस/विरळ केस, टपोरी/मिचमिचे डोळे, असे त्या वर्णनांची त्यांच्या पत्रांना गरज नसते ते सारे व्यक्ती रेखा वाचतांना संदर्भात समजते तरी नंदा प्रधान पेस्तन काका यांना त्यांनी उदार मनाने एखाद दुसरे वाक्य दिले आहे नंदा प्रदानसाठी जवळपास पावणे सहाफुट उंची सडपातळ निळ्या डोळ्याचा लहानशा पातळ ओटांच्या कुरळ्या केसांचा नंदा इतकेच वाक्य खर्ची पाडले आहे हरी तात्या सखाराम गटने म्हटले की ती व्यक्ती चटकन डोळ्यासमोर खरे तर असे म्हणणे बरोबर नाही ती व्याक्ती आपल्या मनात एकारते प्रत्येकाचे नारायण हरी तात्या, नामु परीट यांच्या आकृत्या वेगवेगळ्या असतील कारण आपण नामोचा कोडगेपणा नारायणाच्या कार्यात जोपुण देण्याचा गुण किंवा हरी तात्यांचा इतिहासात रमण्याची वृत्ती मनात साठवून ठेवतो आणि नकळत आसपासच्या मंडळीत शोधात असतो. आणि हेच ते पु.ल. चे ‘चिरंजीव रसायन’ असे मला वाटते. या शिवाय त्या प्रत्येक व्यक्तीची एक अंगभुत कथा असते आणि सजिव वाटतात. त्यांच्या सगळ्याच व्यक्तीरेखा देखण्या आहेत हरितात्या चितळे मास्तर शेवटी डोळे ओले करून जातात. अंतु बर्वा आपली आंतरिक व्यथा वाचकांच्या पदरी बांधुन जातो आणि माझ्यासारखा वाचक त्या जपुन पण ठेवतोत्र. नंदाच उद्ध्वस्तजीण हेलकावून जात.

खरे तर ‘नंदा प्रधान’ ही पु.ल. ची सगळ्यात वेगळी व्यक्तीरेखा आहे. त्यांच्या इतर व्यक्ती आणि वल्ली आपल्याला आसपास सहज सापडतात. पण ‘नंदा प्रधान’ शोधुनही सापडत नाही! हेवा करावा असे देखणे व्याक्तीमत्व अमाप पैसा, तरी दुर्दैवी आणि उधवस्त जीव नशिबी आलेला जीव आई बाप, प्रियसी, बायको-अहो प्रत्येक नात्याचा विस्फोट झालाय, इतके घाव सोसलेला माणूस काहीस अबोल होतो. पु.ल. चा ‘नंदा प्रधान’ उभा करतात नक्की कसं लागला असणार.

मला भावलेली व्यक्तीरेखा आहे जनार्दन नरो शिंगणापूर! या भारदस्त नावाच्या फाटक्या ‘बोल्ट’ ची व्यथा तुम्हाला ऐकायचीय? फक्त खालील संवाद वाचा ‘जुन्या! माझ्या म्हातारपणा बद्दल बोलतोस- आणि गाढवा तु पंचावन वर्षाचा थेरडा, तु माझ्या बाजुला रूख्मिणी म्हणून उभा होतास तो!

तेच त्यासाठीच बोंबलतोस मी! ह्या ह्या लेखकाला तुम्ही तेवढे म्हातारपणी सुभद्रेचं काम करताना वाट दिसला हातातले वर्तमानपत्र नाव नाचवत म्हणाला आणि मी माझ बोलक झालेलं तोंड होवून रूख्मिणी म्हणून उभ होतो. मी नाही दिसतो त्याला?

अरे साल्यानो, टीका करायची म्हणून तरी आमचं असत तर काय जात होत तुमच्या बापाचं!

तर बोल्ट नि नाटकांच्याा संदर्भात वेगळी संकल्पना असते. याच नाव होत, कौतुक होत तो 'नट' होतो आणि बाकी जे दुर्लक्षित असतात त्यांना 'बोल्ट' म्हणून हिणवलं जात जनार्दन नरो शिंगणापूरकर या बोल्टाची व्यथा कुठे तरी पीळ पाडून जातो.

तर पु.ल. च्या व्यक्तिरेखान मधील 'कथा' शोधण्याचा माझा प्रयतक केला आहे. आपणास हि भावेल हि आशा शेवटी सर्वांना एकच आशिष- पु.ल. भवतु!

**निशांत चांदूरकर**
**(B.Com I)**



## एक तरी मुलगी असावी

जगाला आनंद वाटणारी
एक लाडकी परी असावी,
घराला घरपन आणनारी
एक तरी मुलगी असावी.

ती आईची खास मैत्रीण असावी
बाबांचे सगळे लाड पुरवणारी
मस्तीत भावाला चिडवणरी
सगळ्यांना सांभाळून घेणारी,

सगळ्यांना समजून घेणारी असावी
तिच्या हसण्याने घर हसावं
तिचा रडण्याने घर रडावं,
आजीची लाडकी, आजोबाची गुडिया असावी

प्रत्येक सुख दु:खात साथ देणारी
आई-बाबांना मुलापेक्षा ही छान सांभाळणारी
एक तरी मुलगी असावी.

**प्रतिक्षा भोयर**
११ वी कला

# मीराबाई



**जीवन परीचय**

भक्तीयुग की सर्वश्रेष्ठ कवियीत्री कृष्णभक्ती मे पुरी तरह रंगे हुई मीराबाई १६ वी सदी की महान विभुतियो मे से एक थी। बचपन से ही कृष्ण से प्रेम करने वाली मीरा को संसार कृष्णमय लगता था। उनका रोम रोम कृष्णमय था। उनका मन संत-समागम, संगीत भगवत चर्चा कृष्ण लीला मे ही लगता था। वो सांसांरिक सुखो से दुर सदा रहती थी।

कृष्णभक्त मीराबा का जन्म मेहता के राठौड राजा रावदुदा के पुत्र रतनसिंह के घर गॉव तुकडी मे १४९८ मे हुआ और उनका विवाह १५१६ मे राणा सांगा के जेष्ट पुत्र युवराज भोजराज के साथ हुआ था। मीराबाई के विवाह के सात वर्ष के पश्चात ही युवराज भोजराज की मृत्यु हो गयी तथा मीराबाई युवावस्था मे ही विधवा हो गयी। मीराबाई बचपन से ही कृष्ण-भक्त थी। उनका अधिकाँश समय भजन-कीर्तन मे ही व्यातीत होता था।

**सुप्रसिद्ध भजन**

**पायो जी मैने राम रतन धन पायो**

यह मीराबाई का सुप्रसिद्ध भजन हम सब ने सुना है। मीरा बाई एक बहुत ही प्रसिद्ध और जानी मानी कवियत्री होने के साथ साथ भक्ती की बात आती है। तो सबसे पहले जुबान पर मीरा बाई का नाम आता है जिन्होने श्री कृष्ण की भक्ती के लिए अपना पुरा जीवन त्याग दिया। मीरा बा के हर भजन और कविता मे श्री कृष्ण की भक्ती छलकती है। उन्होने भजन सुनने मे सबको अच्छे लगते है। तो चलिए आज हम भी मीराबाई के लिखे भजन और कविताओ को पढकर भगवान श्री कृष्ण की भक्ती मे लीन हो जाऐंगे।

**रचनाए**

कृष्ण भक्ती शाखा को प्रमुख कवियीत्री मीराबा की रचनाए आज भी उत्तर भारत मे बहुत लोकप्रिय है। बचपन से ही मीरा अपने पिता जी की कृष्ण भक्ती से बहुत प्रभावित थी। इसी का असर था की उन्होने पति की मृत्यु के बाद कृष्ण भक्ती मे अपना सर्वस्व जीवन न्योछावर कर दिया।

नैना निपट बंकट अटके, मोती मुँगे उतार बनमाला पोई, हरी तुम हरो जन की भीर

**दोहे**

मेरे तो गीरधर गोपाल दुसरों न कोई।
जाके सिर मोर मुकुट मेरो पति सोई।।

**प्रसिद्ध कविता**

**पायो जी म्है तो राम रतन धन पायो**

वस्तु अमोलिक दी म्हारे सतगुरू किरपा कर अपनाओ।। जनम-जनम की पूँजी पा, जान मे सभी खावायो।

खरच न खुटै चौर न लुटै, दिन-दिन बढत सवायो।। सत की नाँव खेवटिया सतगुरू, भवसागर तर आयो।

'मीरा के प्रभु गिरीधर नागर, हरख हरख जस पायो।। कहा गयोरे पेलो मुरलीवालो आमने रास रमाडी।।

रास रमाडवाने वनमा तेड्याा मोहन मुरली सुनाविरे।।१।।

माता जसोदा शाख पुरावे केशव छांत्या धोळीरे।।२।।

हमणा वेण समारी सुती प्रेहरी कसुंबळ चोळीरे।।३।।

मीरा कटे प्रभु गिरीधर नागरचरण कमल चित्त चोरीरे।।४।।

**कृतियाँ**

मीराबाई ने चार ग्रथो की रचना की - नरसी का मायरा

गीत गोविंद टिका राग गोविंदराग सोरठ के पद

इसके अलावा मीराबाई के गीतो का संकलन मीराबाई की पदावली नामक ग्रंथ मे किया गया है।

**जयश्री मेश्राम** (B.Com I)

# रविन्द्र नाथ टैंगौर



रविन्द्र नाथ टैगौर विश्वविख्यात कवि, साहित्यकार दार्शनिक थे जिन्हें गुरूदेव कह कर भी पुकारा जाता था. इन्हे साहित्य के लिए नोबेल पुरस्कार से भी नवाजा गया था। ये एशिया के प्रथम नोबेल पुरस्कार सन्मानित व्यक्ती है तो आइ्ये जानति है रविंन्द्र नाथ टैगौर का जीवन परीचय.

रविंन्द्र नाथ ठाकूर का जन्म देवेन्द्र नाथा टैगौर और शारदा देवी के संन्तानके रूप में ७ मई, १८६१ को कोलकाता के जोडासाँ को ठाकूरवाडी मे हुआ था। उन्होंने लन्दन विश्वविद्यालय मे कानुन का अध्ययन किया लेकिन १८८० में बिना डिग्री हासील किए ही स्वदेश वापस आगाए सन १८८३ में मृणालिनी देवी के साथ उनका विवाह हुआ।

मानव संस्कृती के अमर गायक 'कवींन्द्र' रविंन्द्र नाथ **(Ravindranath Tagore)** ने आंतरराष्ट्रीय मंच पर भारतीय साहित्य को सन्मान दिलाकर देश की शान बढा। रविन्द्र नाथ बंगाल के सिर्फ कवि ही नही थे तो वो उत्कृष्ट संगीतकार, कथाकार, नाटककार, दार्शनिक, समालोचक, अभिनेता, चित्रकार थे सभी कुछ और हर एक क्षेत्र में उन्होंने विलक्षण प्रतिभा का परिचय दिया।

१८७६ में रविन्द्र नाथ इनकी 'पनकूल' मासीक प्रकाशित हुई। १८७८ में दो इंग्लैंड को गए। लन्दन के ब्रायटन विद्यालय मे और युनिव्हर्सिटी कॉलेज में उनकी कुछ पढाई हुई। पर वा कोई भी पदवी न पाकर १८८० में वापस आये। उनकी सब पढाई स्वसंपादित है। १८८१ मे उन्होने 'वाल्मिक प्रतिया' ये पहला संगीत नाटक लिखा। ऐसे ही 'साधना भारती और वंगदर्शन' इन मासिको का संपादन किया। १९०१ मे कलकत्ता के पास 'बोलपूर' यहाँ 'शांतिनिकेतन के जोडी ने ही ग्रामोध्दार का उदिष्ट आखो के सामने रखकर रविंन्द्रनाथ उन्होने 'श्रीनिकेतन' की स्थापना की।

१९१२ मे रविंद्रनाथ इंग्लंड गये। गीतांजली में आये हुए। बंगाली कविताओ का उन्होने अंग्रेजी में अनुवाद किया। श्रेष्ठ कवि डब्लु.बी. यट्या इनको को अनुवाद इतने पसंद आये की, उन्होने इस संग्रह की प्रस्तावना लिखी और कविता संग्रह की अग्रेजी प्रतिलिंदी प्रकाशित हुई।

१९२१ में रविंद्र नाथ इन्होने 'विश्वभारती' इस विश्वविद्यालय की स्थापना की 'विश्वभारती' ने शिक्षा क्षेत्र में कई न दिशा देने का कार्य किया। १९३० में मतलब रविंद्र नाथ को उम्र ७० साल की वर्ष 'ड्रॉइंग' सिखने की इच्छा हुई। उन्होने घरमे ड्रॉइंग निकांले।

श्रविंद्र नाथ टैगौर जादातर अपनी पद्य कविताओं के लिए जाने जाते है, टैगोर ने अपने जीवनकाल मे को उपन्यास, निबंध, लघु कथाएँ यात्रावृन्त नाटक और हजारों गाने भी लिखे है। टैगौर की गद्य मे लिखी उनकी छोटी कहानियों को शायद सबसे अधिक लोकप्रिय माना जाता है, इस प्रकार इन्हे वास्तव में बंगाली भाषा के संस्करण की उत्पत्ती का श्रेय दिया जाता है उनके काम अक्सर उनके लयबद्ध, आशावादी और गीतात्मक प्रकृती के लिए काफी उल्लेखनिय है। टैगौर ने इतिहास, भाषा विज्ञान और आध्यात्मिकता से जुडी कई किताबें लिखी थी। टैगौर के यात्रावृत्त निबंध, और मनुशर धरमो शमिल थे। अल्बर्ट ऑनस्टान के साथ उनकी संक्षिप्त बातचीत, वास्तविकता को प्रकृती पर नोट बाद के उत्तरार्धो के एक परिशिष्ट के रूप में शामील किया गया है।

**कविताः**

अगर प्यार में और कुछ नहीं
केवल दर्द है फिर क्यो है यह प्यार ?
कैसी मुर्खता है यह, कि चुँकि हमने
उसे अपना दिल दे दिया, इसलिए उसके
दिल पर दावा बनता है, हमारा भी
रक्त में जलती इच्छाओं औार आँखो में
चमकले पागलपन के साथ
मारूथलो का यह बारबार चक्कर क्यों कर ?

दुनिया में और को आकर्षण नही उसकी लिए, उसकी तरह मन का मालिक कौन है। वसंत की मीठी हवाएँ उसके लिए है। फूल, पक्षियों का कालख सब कुछ उसके लिए है।

पर प्यार आता है अपनी सर्वगायी छापाओं के साथ पुरी दुनिया का सर्वनाश करता जीवन और यौवन पर ग्रहण लगता फिर भी न जाने क्यों हमें अस्तित्व को निगलते इस को हरे की तलाश रहती है ?

**सुविचार**

आस्था वो पक्षी है जो सुबह अंधेरा होने

पर भी उजाले को महसुस करती है. - रविंद्रनाथ टैगौर

**Faith Is the bird that feels the light when the down is still dark - Rabindranath Tagore**

**रविंद्रनाथ टैगौर की प्रमुख रचनाए:**

रविंद्रनाथ टैगौर जन्मजात अनंत अवतरित पुरूष थे अर्थात, उनकी रूचि बहुत से विषयों में भी, और हर क्षेत्र में उन्होने अपनी ख्याती फैलाई इसलिए वे एक महान कवि, साहीत्यक लेखक चित्रकार, और एक बहुत अच्छे समाजसेवा भी बने कहा जाता है की, जिस समय बाल्यकाल मे, को बालक खेलता है उस उम्र मे, रविंद्रनाथ टैगौर ने अपनी पहली कविता लिख दी थी जिस समय रविंद्रनाथ टैगौर ने, अपनी पहली कविता लिखी उस समय, उनकी उम्र महज आठ वर्ष थी किशोरावस्था मे तो ठीक से, कदम थी नही रखा था और उन्होने १८७७ मे, अर्थात सोलह वर्ष की उम्र मे, ल१कथा लिख दी थी रविंद्रनाथ टैगौर ने लगभग २२३० गीतो की रचना की, भारतीय संस्कृती मे, जिसमें खास कर बंगाली संस्कृती मे अमिर योगदान देने वाले बहुत बडे साहित्यकार थे।

**रविंद्रनाथ टैगौर की उपलब्धीयाँ:**

रविंद्रनाथ टैगोर को अपने जीवन मे, को उपलब्धीया या सन्मान से नवाजा गयाा परंतु, सबसे प्रमुख थी किया गया।

रविंद्रनाथ टैगोर ने, भारत को और बंगला देश की, उनकी सबसे बडी अमानत के रूप मे, राष्ट्रगान दिया है जो कि, अमरता की निशानी है. हर महत्त्वपुर्ण अवसर पर, राष्ट्रगान गाया जाता है जिसमे, भारत का जन-गण-मन हे व बंगला देश का आमार सोनार बांग्ला हे. यहा ही नही रविंद्रनाथ टैगोर अपने जीवन मे तीन बार अल्बर्ट आइस्टीन जैसे महान वैज्ञानिक से मिले जो रविंद्रनाथ टैगोर जी को रब्बी टैगोर कह कर पुकारते थे।

**रविंद्रनाथ टैगोर की मृत्यु:**

एक ऐसा व्यक्तीत्व जिसने, आपने प्रकाश से सर्वत्र रोशनी कैलाई, भारत के बहुमुल्य रतक मे से एक हीरा जिसका तेज चहु दिशा मे फैला जिससे भारतीय संस्कृती का अद्‌भुत साहित्य, गीत, कथाए, उपन्यास, लेख प्राप्त हुए. ऐसे व्यक्ति का निधन ७ अगस्त विदा को कोलकाता मे हुआ. रविंद्रनाथ टैगोर एक ऐसा व्यक्तीत्व है जो, मर कर भी अमर है।

**लक्ष्मी पंचेश्वर**

**(B.Com I)**

## आस

जीवनाची राहिली ना आस काही
का छळती मनाला भास काही?

सत्य अंती उमजले जीव घेणे
मी कुणासाठी न होतो खास काही

उध्वस्तझाली वादळाने बाग सारी
उरले शेवटी फुलांचे वास काही

गस्त होती पण तिलाही झोप आली
चोरट्यांच्या लागले हातास काही

शोषिताचे भोवताली झुंड आहे
तयांना दे जीवांचे ध्यास काही

व्यर्थ तोरा अन मिजाशी ठिक नाही
आपले असतात येथे श्वास काही

तू उगा का जीव वेड्याा जाळतो रे
न तुझी पर्वा मुळी कोणास काही

**सिमरन सोनकर**

**(B.A II)**

# बा.भ. बोरकर



बाळकृष्ण भगवंत बोरकर यांचा जन्म ३० नोव्हेंबर १९१० रोजी गोव्यातील कुडचडे या गावी झाला. त्यांना सर्व महाराष्ट्र आनंदयात्री कवी म्हणून ओळखतो. असे कादंबरीकार ललीत लेखक, कलाकार बा.भ. बोरकर यांचे मुळ गाव बोरी होय. त्यांचे प्राथमिक शिक्षण पोर्तुगीज शाळेत झाले. १९२८ साली ते धारवाडच्या शाळेतून मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाले. नंतर त्यांची कर्नाटक कॉलेजला प्रवेश घेतला. आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण झेपणार नाही त्यामुळे कॉलेज सोडून ते नोकरीच्या शोधात मुंबईला आले. परंतु मुंबईच्या जीवनाशी त्याचे सुर जुळले नाहीत. पुन्हा गोव्याला परत येऊन वास्कोच्या इंग्रजी शाळेत त्यांनी शिक्षकाची नोकरी पत्करली. कवितेची आवड त्यांना लहानपनापासुनच होती.

बोस्करीचा पहिला कविता संग्रह 'प्रतिभा' हा १९३० मध्ये प्रसिद्ध झाला. त्यानंतर त्यांचा भा.रा. तांबे भास्कर रामचंद्र तांबे आणि वि.स.खांडेकर विष्णू सखाराम खांडेकर यांच्याशी परिचय झाला. 'जोत्सना' या मासिकातून त्यांच्या कवितांना प्रसिद्धी मिळाली.

| | |
|---|---|
| जीवन संगीत | (१९३६) |
| दुधसागर | (१९४६) |
| आनंदभैरवी | (१९५०) |
| चित्रवाणी | (१९६०) |

हे त्यांचे काही काव्यसंग्रह त्यानंतर एक उत्कृष्ट दर्जाचे कवी म्हणून त्यांची कीर्ती होत गेली, पुढे;

| | |
|---|---|
| गितार | (१९६५) |
| चैत्रपुनव | (१९७०) |
| चांदवेल | (१९७२) |
| कांचनसंध्या | (१९८१) |
| अनुरागिणी | (१९८२) |
| चिनमयी | (१९८४) |

आणि 'लावण्यरेखा' अप्रकाशित आदी काव्यसंग्रह निर्माण झाले त्यांच्या कवितेवर भा.रा. तांबे यांचा प्रभाव दिसतो. त्यांची कविता निसर्ग संपन्न जशी आहे. तसाच तिच्यात दिव्यत्वाचा साक्षात्कार होतो अक्षरगण वृत्ते, मात्रा, जातीवृत्ते यावर त्यांची हुकूमत आहे शब्द भांडार समृद्ध असल्यामुळे नादमय रचनांनी बोरकरांनी अनेक वर्षे रसिकांना मुग्ध केले.

बा.भ.बोरकर यांनी कवितेशिवाय कादंबरी, कथा, ललीतलेख चरित्रात्मक प्रबंध असे काही लेख लिहीले आहे. कागदी होड्याा, घुमटातले पारवे, चांदण्याचे कवडसे, पावलापुरता प्रकाश, मावळता चंद्र, चंद्र अंधारातली वाट, भावीत, प्रिथभामा, प्रियदर्शनी समुद्राकाठची रात्र, सासाय. इत्यादी त्यांचर ललीत लेखांची पुस्तके आहेत. स्टीफन इवाइगच्या कादंबऱ्यांचा तसेच महात्मा गांधीच्या संबंधित काही पुस्तकांचा त्यांनी अनुवाद केला. रविंद्रनाथांवर त्यांनी काही पुस्तके लिहीली त्याच्या कोकणी भाषेत ८० साहित्यकृती आहे.

**रोहित वाघ**
(११ वी कला)

# माझी जडणघडण



### जन्म व बालपण

माझा जन्म १ जुलै १९२९ रोजी मध्यप्रदेशातील बालाघाट जिल्ह्यातील रामपायली या गावी झाला. माझ्या वडिलांचे नाव रामचंद्र आणि आईचे नाव चंद्रभागा. वास्तविक आमचे घराणे वर्धा जिल्ह्यातील हिंगणी या गावचे. हिंगणीला माझे वडिल शेतकरी होते. त्यांची शेती होती आणि ते सोनारकीचा व्यवसाय करीत असत. पण आईच्या प्रकृतीच्या अस्वस्थ्यामुळे त्यांनी तिला रामपायलीच्या सुप्रसिद्ध वैद्याकडे नेले होते आणि तेथेच माझा जन्म झाला. माझे वडील दूरदृष्टीचे होते. ते स्वत: मराठी चार वर्ग शिकले होते आणि तत्कालीन नियंत्रणाप्रमाणे तिसऱ्या वर्गापर्यंत शिक्षकी पेशाही केला होता. यापुढील काळात शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे त्यांनी जाणले होते. म्हणून माझ्या जन्मानंतर त्यांनी हिंगणी सोडली व ते नागपूरला स्थानिक झाले. इतवारीतील चांदीसोन्याच्या ओळीत त्यांनी जेठमल नावाच्या गृहस्थाच्या भागीदारीत आपले दुकान थाटले थोरला विनायक, नंतर बहीणाबाई, जयकृष्ण, राधिका, केशव, मी आणि सर्वात धाकटी लीला असे आम्ही सात भावंडे होतो. पण मी सहा वर्षाचा असतानाच विनायक ऐन तारूण्यात मरण पावला त्याचवेळी जेठमलने विश्वसंघात केल्यामुळे इतवारीतले दुकान बुडले. आम्ही अन्नाला महाग झालो. वडील मांडोघोराड या खेड्यात जाऊन सोनारकी करू लागले. अधुन मधुन ते नागपूरला येत. कामासाठी पोतडी घेऊन रेंगीने जात असताना दरोडेखोरांपासुन त्यांना रेंगीच्या बैलीने स्वत:ची प्राण समावून वाचवले. वडीलांनी त्याची समाधी बांधली माझे मराठी दुसरीपर्यंतचे शिक्षण मारूतीच्या देवळातझाले व नंतर चौथी पर्यंतचे इतवारी शाळेत झाले. या काळात आम्हाला दोन वेळचे जेवण कधीच मिळाले नाही. पोटभर पाणी पिऊन शाळेत जायचे. शाळा सुटल्यावर घरी येताना रस्त्यावरच्या काट्याा उचलून आणायच्या त्या पेटवून त्यावर आई भाकऱ्या भाजायची. आमच्या वाट्याल्या प्रत्येकी एक किंवा सव्वा भाकर येत असे. एखादवेळी विनातेलाची उकडलेली भाजी असायची.

पण ही गरीबीच माझ्यासाठी वरदान ठरली. माझ्याजवळ फक्त एक पाटी व लेखणी होती. ना पुस्तक त्यामुळे शिक्षक जे शिकचतील ते आपण कधीच विसरणार नाही इतके मन लाऊन ऐकणे ही श्रवणभक्तीची सवय मला जडली. चौथ्या वर्गाची परीक्षा उत्तीर्ण झालो. नागपूर जिल्ह्यात मी पहीला आलो. पण पुढचं शिक्षण घ्यायचं तर फी भरावी लागणार होती. म्हणून त्यानंतर माझं शिक्षण बंद झालं. यावेळी नागपूरात 'महाराष्ट्र' हे एकच वृत्तपत्र होते. ते आठवड्यातून रविवारी व बुधवारी असे दोनदाच निघायचे. ते विकून मी आईला पैसे देत असे.

### शिक्षण व संस्कार

वृत्तपत्र विकता विकता महालमधील सी.पी. ॲन्ड बेरार हायस्कूल माझ्या दृष्टीस पडले. खिडकीतून पाहले तो शिक्षक खुर्चीवर बसलेले आणि विद्यार्थी छानपैकी बाकावर विराजमान होते. मला हेवा वाटला शाळा आतून पहाळी म्हणून मी आत शिरलो. माझा मळका फाटलेला शर्ट पाहून चपरूशानं मला पकडून गोखले मुख्याध्यापकांसमोर नेऊन उभं केलं. सर म्हणाले, कशाला शाळेत घुसला होतास? शाळा पहायला मग त्यांनी विचारलं, किती शिकला आहेत? मराठी चौथा वर्ग पास झालोय किती गुण मिळाले? ते सांगताच सर अवाक् झाले. उद्या तुझ्या वडीलांना घेऊन ये. मला आनंद झाला. मी वडीलांना सांगीतलं त्यांनी मला जवळ बोलावून फाडकन माझ्या गालफटात ठेवली म्हणाले, शाळेत जायला कोणी सांगीतलं होतं तुला? आता उद्या शाळेत जावं लागेल ना गुणपत्रिका घेऊन! दुसऱ्या दिवशी आम्ही शाळेत गेलो. गुणपत्रिका पाहून सरांच्या डोळ्यात पाणी आलं ते म्हणाले, उद्यापासून तुम्ही याला आमच्या शाळेत पाठवा. फी माफ मी याला एक वही व पेन्सिल फुकट देईल. हा पास होत राहील तोपर्यंत याचं शिक्षण मोफत.

माझं शिक्षण सुरू झालं. सकाळी पेपर विकणं, नंतर शाळा, नंतर जेवण व खेळणं, रात्री म्युनसीपालटीच्या दिव्याखाली मित्राकडून आणलेल्या पुस्तकाचं वाचन असा क्रम सुरू झाला. घरात तिथं खायला तेल नाही तिथं दिवे कसे असणार? पण मनात भीती होती की आपण नापास झालो रे झाले की आपले शिक्षण बंद, म्हणून वर्गात एकाग्र चित्तांत ऐकत होतो. परीक्षा झाली. मी वर्गात पहिला आलो. आठवणीपर्यंत मी पहिला क्रमांक सोडला नाही. चौथीनंतर दोन वर्ष माझी शिक्षणवाचून गेली होती. ती भरून काढायला विनाशुल्क या अटीवर मी महालच्या न्यु इंग्लिश हायस्कुलमध्ये दाखल झालो व एक वर्षात दोन वर्ग उत्तीर्ण केले. १९४७ साली मॅट्रीक पास झालो. येथे उष:काल कादंबरी एका रात्रीतून वाचून काढली. नंतर वाचनाचे मला व्यसनच जडले. माझी लहान बहीण लीला माझ्यापेक्षा हुशार होती. पण शिकलेल्या मुलीला आमच्या समाजात नवरा मिळणे कठीण असल्यामुळे तिला इंग्रजी शाळेत टाकले नाही हिस्लॉप कॉलेजचे प्राचार्य डॉ. डी.जी. मोझेस यांनी मला मोफत शिक्षण दिले. डॉ. सं.दा. पेंडसे व डॉ. अ.ना. देशपांडे मराठीचे प्राध्यापक होते. ते शुद्धलेखनाच्या एका चुकीवर एक गुण कापत असत. म्हणून अत्यंत व परीपूर्ण शुद्धलेखनाची मला सवय जडली. प्रसिद्ध साहित्यीक ग.ष्य.माडखोलकर यांचा मुलगा चंद्रशेखर माझा वर्गबंधु होता. पण मराठीत त्याच्यापेक्षा मला अधिक गुण मिळायचे गरिबांविषयीची कणव हा माझा स्थायिभाव बनल्याने डॉ. मोझेसनी मला नाईट स्कूलचे विनावेतन मुख्याध्यापक बनवले. प्रा.ना.सी.फडके निर्मित महाराष्ट्र साहित्य मंडळाचा मी सचिव म्हणून निवडून आलो. १९५१ साली बी.ए. पास झालो.

**व्यवसाय व अनुभव**

लगेचच रिझर्व बँकेत नोकरीला लागलो. पण मुंबईला बदली होताच ती नोकरी सोडून डी.ए.जी पीटीत नोकरी करू लागलो. आमची आर्थिक स्थिती सुधारली. कालेजपर्यंत मला पायजामा होता. ऑफिसमध्ये नोकरी लागल्यानंतर पहिली पँन्ट शिवली. येथूनच खासगीरित्या एम.ए. केले. डॉ. पेंडसे निवृत्त झाल्यावर १९६१ साली डॉ. मोझेस यांच्यामुळे डी.ए.जी.पी.टी. सोडून प्राध्यापक झालो. तत्पुर्वी १९५७ साली माझे लग्नझाले. माझ्या पत्निचे नाव सुचिता त्यानंतर एक वर्षांनी माझे पित्रुछत्र हरवले. एक वर्ष हिस्लॉप, एक वर्ष मोहता सायंन्स कॉलेज येथे प्राध्यापकी केल्यावर डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांनी धनवटे नॅशनल कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून नियुक्ती केली. प्राध्यापकांना दीडशे रुपये वेतन मिळत होते. प्रा.मो.म.लांजेवार आमचे प्राचार्य होते. येथुनच मी १९७८ साली डॉ. सुरेश डोळके यांच्या मार्गदर्शनाखाली 'महर्षी वि.रा.शिंदे व्यक्ती व वाङमय' या विषयावर पी.एच.डी. मिळवली.१९८९ साली सेवानिवृत्त झालो. या काळात विद्यापीठाचे अभ्यासमंडळ, पाठ्यापुस्तक निर्मिती मंडळ, परीक्षा मंडळ, प्राध्यापक नियुक्ती मंडळ अशा कितीतरी मंडळात कार्य केले. डॉ. पंजाबराव देशमुख पतसंस्था, भाग्योदय गृहनिर्माण संस्था, विजय अपार्टमेंट्स या संस्थाचा अध्यक्ष होतो. निवृत्तीनंतर माझे विद्यार्थी श्री. गोविंदराव वंजारी यांच्या विनंतीवरून मी संताजी महाविद्यालयात मानद प्राध्यापक म्हणून दहा वर्षे शिकवलं, दोन वर्षे डॉं आंबेडकर महाविद्यालयात शिकवलं पी.एच.डी. चा मार्गदर्शक बनलो. परीक्षक म्हणून अनेकांना पी.एच.डी. पदवी प्रदान केली. मुख्य म्हणजे विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य केले.

**लेखन व सन्मान**

माझ्या लेखनाची सुरूवात आकाशवाणीवरील नभोनाट्यापासुन झाली ३-०९-५७ रोजी माझे पहिले नभोनाट्या 'प्रवासी' पुरूषोत्तम दारवेकरांनी आकाशवाणीवरून प्रसारित केले. पुढे आकाशवाणीवर १६ नभोनाट्यो व १० 'चिंतन' प्रसारित झाले. 'भले मिळाले व्याही' हे माझे पहिले नाटक. माझे नाट्याप्रेम अनुवांशिक आहे. वडीलांची एक नाट्यासंस्था होती. ते स्वतः संत दामाजींची भुमिका करीत. नंतर मी इतिअशांनी','एक राणी तीन गुलाम','मंदोदरी' इ. १२ नाटके लिहिली. अ.भा. नाट्यापरीषदेचा श्रेष्ठ नाटककार म्हणून कै. राम गणेश गडकरी पुरस्कार मिळाला. 'भले मिळाले व्याही' चे सर्वाधिक १०८ प्रयोग झाले. नाना रेटर यांनी 'मृत्युपत्र' हे एकपात्री नाटक केले. माझ्या नाटकाचे दिग्दर्शन बंगाली असोसिएशनचे देवाशिष रॉय व श्याम बंड करीत असत. एकांकिका स्पर्धेसाठी एकांकिका लिहील्या.

निवृत्तीनंतर नाट्यालेखनाला विराम दिला. बालवाङमय लिहीले विद्यार्थ्यांना परीक्षेत उत्तम यश मिळावे म्हणून मार्गदशिका लिहिल्या. त्यातुन लेखनशैली अधिकाधिक प्रभावी बनली. आज माझे वय ९० वर्षाचे आहे तरी माझे लेखन चालूच आहे. मार्गदर्शिका वगळून माझी एकूण ६० पुस्तके प्रकाशित झाली आहेत. मराठीत गणितासारखे गुण मिळतात, पण केव्हा? हा माझ्या व्याख्यानाचा विषय आहे आणि विदर्भातल्या अनेक महाविद्यालयात, रेणुका महाविद्यालयातही माझे व्याख्यात झाले आहे. 'विद्यार्थ्यांचे शिल्पकार','विद्यार्थ्यांचे कल्पवृक्ष','मित्रभूषण', 'जीवनगौरव', 'ज्ञानयोगी' अशा उपाधींनी कितीतरी संस्थांनी मानपत्रे देऊन मला सन्मानित केले आहे.

**जीवनध्येय व यशाचा मुलमंत्र**

आईने माझ्यावर स्वाभिमान व बाणेदारपणा हे संस्कार केले वडीलांनी प्राण्यांवर प्रेम व निष्काम कर्म ही शिकवण दिली. पत्नी सुचिताने जिवनाची प्रेरणा दिली. स्वाती, श्रीकांत व सुशील ही माझी मुले, ते व त्यांचे कुटुंबीय मला जिव्हाळा देत आहेत. मित्रांनी माझ्या सहृय भावनेचा परिपोष केला आणि विद्यार्थ्यांनी माझ्या लेखनाला आकार दिला आहे. जगण्यासाठी माणसाला काही ध्येय असावे लागते. प्रामाणिकपणा व जिद्द हा जीवनध्येयाचा यशाचा मुलमंत्र आहे. माझे ध्येय कोणते? संत तुकाराम म्हणतात, 'तुका म्हणे आता। उरलो उनकारापुरता।।' तसेच मी ही म्हणतो, 'मनोहर म्हणे आता। उरलो विद्यार्थ्यांपुरता।।

**डॉ. मनोहर रोकडे**

# मराठी संत कवयित्री



दक्षिणेमध्ये सहाव्या शतकामाध्येच स्त्रियांवर भक्तिमार्गाचा प्रभाव सुरू झालेला दिसतो. त्यानंतर देशाच्या वेगवेगळ्याा भागात वेगवेगळ्याा काळी संत कवयित्री उदयाला आलेल्या दिसतात. साहित्य हे आत्माविकाराचे एक महत्वाचे साधन. त्यामाध्यमातून या कवयित्रींनी आपली अभिव्यक्ती केलेली दिसते. तेराव्या शतकापासून ते सतराव्या शतकाच्या दरम्यान स्त्री संताजी व संत कवयित्रीची अशी एक मालिकाच होऊन गेलेली आपल्याला दिसते यामध्ये-

**१. महदाईसा शके (११६० ते १२३०) -** मराठी सारस्वताच्या अगदी महाद्वारापाशीच आपल्याला एका आगळ्याा वेगळ्याा स्त्रीचे दर्शन होते. हीच 'धवळे' कर्ती महदाईसा किंवा महदंबा किंवा रूपाईसा. आद्य मराठी कवयित्री. ही लग्नानंतर लवकरच विधवा झाली. वैधव्यप्राप्तीनंतर ती दादोसाच्या सहवासात आली. व दादोसमार्फत तिची चक्रधराशी गाठ पडली. आणि ती चक्रधराची शिष्या झाली.

द्विपूरला श्रीप्रभूंच्या सान्निध्यात असतांना तिने धवळे गाईले. धवळ्यााचा उत्तरार्ध म्हांटभटाच्या उत्तेतजनार्थ झालेला आहे. तसेच याच वास्तव्यात तिने

आरत्या व पदनिर्मितीही केली. या स्फूट रचनेनंतर ती पुढे चमत्कृतीपूर्ण रचनेकडे वळली. व मातृकी वृत्तांत तिने रूक्मीणी स्वयंवर लिहिले म्हणून त्यास 'मातृकी रूक्मीणी स्वयंवर' असे नाव आहे.

**२. मुक्ताबाई शके (१२०१ ते १२१९)-** ही ज्ञानेश्वरांची धाकटी बहीण. तिचे चरित्र पाहिले की एका तेजस्विनीची प्रतिमा मनावर उमटते. संत नामदेवांना ती सणकाडीप्रमाणे भासली. पण मोठमोठ्याा संताचे आसन हादरवणाऱ्या मुक्ताबाईला क्षीणतेज सणकाडी पेक्षा सौदामिनी म्हणणे अधिका सार्थ वाटते. आपल्या अल्पशा आयुष्यात थोरांना लाजवित एवढे ज्ञान तिने प्राप्त केले. उच्चपद मिळविले. या अल्पवयातच मुक्ताबाईने प्रतिभेने घेतलेले परमार्थिकतेचे उड्डान स्मितीत करणारे आहे. एवढ्याशा वयात एवढे ज्ञान कुठून कसे आले? या प्रश्नाला उत्तर नाही. कर्ण जसा कवच कुंडलासह जन्माला आला तशी ही चारही भावंडे परिणत आध्यात्माचे लेणे घेऊनच जन्माला आली असावी असे म्हणावे लागेल.

ज्या चांगदेवाने मुक्ताईला गुरू केले. त्याला बाळ कल्पून मुक्ताईने सहा अभंग रचले आहेत. पण मुक्ताईच्या काव्यकर्तुत्वाची विशेष फडकवलेली सर्वपरिचित अशी पताका म्हणजे तिने रचलेले ताटीचे अभंग. कोण्या एका प्रसंगी सहन कराव्या लागलेल्या लोकनिंदेमुळे उद्विग्न होऊन ज्ञानेश्वरांनी स्वत:ला आपल्या खोलीत कोंडून घेतले व दार लवून टाकले. त्यामुळे ताटी उघडा अशी ज्ञानदेवांना विनंती करण्याकरिता तिने हे अभंग रचले. त्याची परमार्थ माधुरी थोडी चाखुन बघूया.

**योगी पावन मनाचा। साही अपराध जनाचा।।**
**विश्‍व रागे झाले वन्ही। संते सुख व्हावे पाणी।।**
**शब्दशस्त्रे झाले क्लेश। संती मानावा उपदेश।।**
**विश्वपदब्रम्ह दोरा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा।।**

**३. जनाबाई-** अतिशय सामान्यातले हे असामान्य व्यक्तित्व आहे. हिच्या भक्तीचा रंग आगळा व कवितेचा रंगही आगळा आहे. वारकरी पंथाचे प्रवर्तक संत नामदेव यांची ही शिष्या व दासी. लहानपनापासून ती त्यांच्याकडे वाढलेली. एक अनाथ शुद्रकन्या, नामदेवांचे बोट धरून तिने आपल्या आध्यात्मिक व साहित्यिक प्रवासाची सुरूवात केली. पण पुढे ते बोट सोडून तिने स्वत:ची वेगळी वाट शोधली. मिच्या कवितेला सर्वतोमुखी होण्याचे भाग्य लाभले. ती जनमाणसात रूजली अन लोकपरंपरेने आजवर टिकून ठेवली. आजही जनीचे बोल हे अमृताचे बोल वाटतात. तिचे अभंग ही भावगीताची एक मालिकाच वाटते अशी ही वात्सल्याची सुवर्णमुर्ती संत वाटीकेतील जाईचा वेल आहे. भगवदभक्त दमा व करूंड या दाम्पत्याची ती कन्या. आई बाप मेल्याने तिला संतमेळ्यात स्थान मिळाले. तिच्या प्रत्येक कामात विठ्ठल साथी असे.

**राणी गेली शेणासाठी। वेचु लागे विठो पाठी।।**

अशिक्षित असूनही ३४५ अभंग व काही स्फूट रचनाही तिने केलेली आहे.

**४. सोयराबाई-** चोख्याची महारी सोयराबाई हीने आपले अंत:करण अभंग रचून मोकळे केले आहे. पंढरीच्या ब्राम्हणांच्या चोखोबांचा छळ केला ही आपली तक्रार तिने नोंदवून ठेवली आहे. तसेच आपले दारिद्र्याही तिने विठ्ठलाच्या कानावर टाकले आहे. आपल्या अगतिक अवस्थेत तिने देवाजवळ दयेची याचना केली आहे. 'येई वो विठ्ठले लवकरी। धावे तू सत्वरी मजलागी''. सोयराबाई

मते देहाचा विटाळ अर्थशुन्य आहे आणि आत्मा निर्मळ व शुद्धबुद्ध आहे. नाममार्गावरही सोयराबाईची उदंड आणि भक्कम श्रद्धा आहे. एक अनन्य भक्त म्हणून सोयराबाईची महती पटवून देण्यासाठी विष्णूदास नाम्याने एक कथा रचलेली आहे.

**५. निर्मळा-** निर्मळा ही चोखोबाची बहीण होती. हिचा एकेक अभंग म्हणजे छोटेशे करूणार्त भावगीतच आहे. संसारात सुख नाही पण नामाचाही गोडी लागलेली नाही अशी ती मनाची द्विधा अवस्था, तिचे चित्रण हा तिच्या अभंगाचा विषय.

सुख अणुमात्र नाही संसारी। सदा हावभरी रात्रंदिवस।। न घडे न घडे नामाचे चिंतन। संताचे पूजन न घडेचि।। यामुळे देवाला तिची करूणा आली आणि या अवस्थेतून ती बाहेर पडली. मज नामाची आवडी। संसार केला देशोधडी।। निर्मळा म्हणते, परमार्थ बोलणे सोपे आहे पण आचरणे फार कठीण आहे. परमार्थ वर्म तिने अचूक ओळखले आहे.

**६. कान्होपात्रा**- ही मंगळवेढ्यातील श्यामा नावाच्या नायिकीणीची मुलगी. तिने आपल्या आईचा व्यवसाय सोडला व खऱ्याखुऱ्या आवडीने. अनावर ओढीने भक्तिमार्गात प्रवेश केला. तिच्या नावावर २७ अभंग असून भ्रष्ट, पतित, यतिहिन अशा अवस्थेतील कान्होपात्रेची आगतिक व हृदयभेदक आर्तता या अभंगात उमटलेली आहे. दीन पतित अन्यायी। शरण आले विठाबाई।। मी तो आहे यतिहिन। न कळे काही आचरणा।। नाममार्गवरही तिची निःस्सीम श्रद्धा आहे. ईश्वर फक्त भक्तांचेच ऐकतो असे तिचे सांगणे आहे कान्होपात्राही ईश्वराला शरण गेलेली एक श्रेष्ठ भक्त आह. भक्ती व करूण या रसांची उत्कट, जिवंत प्रतिती आपल्या वाणीतून प्रकट करू शकणारी एक प्रभावी कवयित्री आहे.

**७. भागू-** १३ व्या शतकात भागूचा उल्लेख सापडतो. ही महार अस्पृश्य समाजातील असल्यामुळे तिला देखील सामाजिक अन्याय सोसावा लागला. तिची चरित्रविषयक माहिती फारशी उपलब्ध नाही. सकलसंतगाभ्यात तिच्या नावावर केवळ पाच अभंग आढळतात. ज्ञानेश्वराबद्दल आदर व विठ्ठलप्रेम हे तिच्या अभंगाचे विषय आहे.

**८. बहिणाबाई-** संत तुकारामशिष्या बहिणाबाई ही संत वांङमयातले एक गूढ व्यक्तीत्व. महायोगीनी म्हणून ती नावाजली. गुरूंचा सहवास व मार्गदर्शन न लाभताही तिच्या बौद्धिक उंचीची, प्रापंचिक सामाजिक यशाची ती एकमेव वाटेकरी व म्हणून ती स्वयंप्रकाशी आहे. आयुष्यातील घटना सांगणारी एकमेव आत्मचरित्रकार. संत तुकारामावर तिची फार मोठी श्रद्ध होती. तुकारामांनी स्वप्नात जाऊन तिला गुरूपदेश केला. ज्ञानदेवे रचिला पाया। तुका झालासे कळस।। हा तिचा अभंग प्रसिद्ध आहे.

**९. वेणाबाई शके (१५४९ ते १६००)-** ही समर्थ रामदासांच्या प्रभावशाली एक तेजस्वी स्त्री. त्यांचीच पटशिष्या. समर्थांच्या मठ जीवनातील आचारधर्माचे कठोर पालन करून पंथात आपल्या योग्यतेमुळे उच्च अधिकार व प्रतिष्ठा मिळविणारी ती वेणास्वामी. तिची चरित्रविषयक माहित अत्यल्प आहे. ज्यावेळी समर्थ रामदासांची भेट झाली तेव्हा तिचे वय १५/१६ वर्षाचे असावे. मिरजेस तिचे सासर होते. सामर्थाच्या भेटीनेच तिचे आयुष्य पार बदलले. तिच्या नावावर काही ग्रंथरचना आहे.त्यात रामायण, सीता स्वयंवर, कौल, रामगुहसंवाद हे ग्रंथ तर काही स्फूट रचनातून तिच्या आध्यात्मिक ज्ञानाची व पारमार्थिक अधिकाराची कल्पना येते.

**१०. बयाबाई-** बयाबाई ही वेणाबाईची शिष्या होती. गिरीधर स्वामी बयाबाईचे शिष्य होते. तिचा जन्म व समाधीविषयी माहिती मिळत नाही. ती निष्ठावंत रामभक्त असून तिला रामाचा साक्षात्कार झाला होता. तिची गुरूभक्तीने ओथंबलेली आहे.

महदाईसा ते वेणाबाई म्हणजेच चक्रधर ते रामदास हा सुमारे ५०० वर्षाचा काळ माहाराष्ट्राला धार्मिक, राजकिय, सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीने अतिशय महत्वाचा. याच काळात संत कवयित्रीचे काव्य उदयास आले अशिक्षित असूनही उत्कृष्ठ काव्याचा नमुना या कवयित्रीनी महाराष्ट्रीयनांसमोर ठेवला.

**आयुष्यमान द्याोत उत्तर!**

**असे जगावे दुनियेमध्ये, आव्हानाचे कावन अत्तर, रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर.**
**नकोगुलामी नक्षत्राची, भीती आंधळी ताऱ्यांची आयुष्याला भिडतानाही, चैन करावी स्वप्नांची.**
